अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

**सभा क्रमांक - ०१ मंगळवार दिनांक २५/०६/२०१९ रोजी दुपारी १.०० वाजता महानगरपालिकेच्या राजमाता जिजाऊ सभागृहात होणा-या मा.सर्वसाधारण सभेची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय** |
|---|---|
| ०१ | अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१८-२०१९ चे सुधारित व सन २०१९ - २०२० चे मुळ अंदाजपत्रक मा.स्थायी समिती ठराव क्र. ६१ दिनांक ०७/०३/२०१९ अन्वये शिफारशीसह मंजुरीसाठी. |
| ०२ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. |

मा.महापौर यांचे मान्यतेने.
दिनांक : १८/०६/२०१९.
अहमदनगर.

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

जा.क्र.अम / सका - ०१ / २०१९.
महानगरपालिका सचिव कार्यालय.
दिनांक : १८/०६/२०१९.

**अहमदनगर महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय सर्वसाधारण सभेची सुचना.**

(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण - २ नियम क्र.१ (अ) अन्वये )

**सभा सुचना क्रमांक ०१, मंगळवार दिनांक २५/०६/२०१९.**

प्रति,
सन्मा.श्री. / श्रीमती.......................................................

सदस्य,
अहमदनगर महानगरपालिका,
अहमदनगर.

यांस-

महोदय,

याद्वारे कळविण्यांत येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ नियम क्र.१ (अ) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची अंदाजपत्रकीय सर्वसाधारण सभा **मंगळवार दिनांक २५/०६/२०१९ रोजी दुपारी १.०० वाजता नविन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील महानगरपालिकेच्या राजमाता जिजाऊ सभागृहात** सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्याची विनंती करण्यांत येत आहे.

सोबत : १. विषय पत्रिका
२. प्रस्तावाची टिप्पणी.

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

जा.क्र.अम / सका - ०१ / २०१९.
महानगरपालिका सचिव कार्यालय.
दिनांक : १८-०६-२०१८.

प्रति,
सन्मा.श्री. / श्रीमती.....................................................

सदस्य,
अहमदनगर महानगरपालिका,
अहमदनगर.

यांस-

महोदय,

याद्वारे कळविण्यांत येते की, अहमदनगर महानगरपालिकेची अंदाजपत्रकीय सर्वसाधारण सभा मंगळवार दिनांक २५-०६-२०१९ रोजी दुपारी १.०० वाजता आयोजित केली होती. या सभेत अंदाजपत्रक सादर केल्यानंतर त्यावर अभ्यासासाठी सदस्यांना अवधी मिळावा या मागणीनुसार सदरची सभा मा.महापौर यांनी तहकुब करुन, **तहकुब सभा बुधवार दिनांक २६/०६/२०१९ रोजी दुपारी १.०० वाजता नविन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील महानगरपालिका सभागृहात** पुढे सुरु होईल असे आदेशीत केले आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्याची विनंती करण्यांत येत आहे.

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**सभा क्रमांक ०१**

**प्रस्ताव क्रमांक : ०१** **दिनांक २५ /०६/२०१९**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१८-२०१९ चे सुधारित व सन २०१९ - २०२० चे मुळ अंदाजपत्रक (मनपा शिक्षण विभाग शेअर्ससह) मा.स्थायी समिती ठराव क्र. ६१ दिनांक ०७/०३/२०१९ अन्वये शिफारशीसह मंजुरीसाठी.

--*--

**प्रस्तावाचा मजकुर :-**

विनंती टिप्पणी देण्यात येते की, सन २०१७-२०१८ चे सुधारीत व सन २०१८-२०१९ चे मुळ अंदाजपत्रकास मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ७६ दिनांक १९/०३/२०१८ अन्वये शिफारस करण्यात आली असून अखेर मंजुरीस्तव मा.महानगरपालिका सभेपुढे ठेवण्यास सूचीत केले आहे.

तरी सन २०१७-२०१८ चे सुधारीत व सन २०१८-२०१९ चे मुळ अंदाजपत्रक (मनपा शिक्षण विभाग शेअर्ससह ) चा विषय मा.महानगरपालिका सभेपुढे ठेवण्यात यावा. ही विनंती.

**---*---**

**<u>दिनांक ०७/०३/२०१९ रोजी झालेल्या मा.स्थायी समितीच्या विषय क्रमांक ६१ चा ठराव :-</u>**

**ठराव :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ नुसार सन २०१८-२०१९ चे सुधारित व सन २०१९-२०२० चे मुळ अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे .सदर अधिनियमातील कलम ९६ च्या तरतुदीनुसार अंदाजपत्रक मा.स्थायी समिती सभे समोर पाहिले.

अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१८-२०१९ चे सुधारित व सन २०१९-२०२० चे मुळ अंदाजपत्रकावर सविस्तर सखोल चर्चा करणेत येवुन ही सभा मा.सदस्य यांनी केलेल्या सुचना तसेच दुरूस्ती व फेरफारसह शिफारस करीत आहे.

अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१८-२०१९ चे सुधारित व सन २०१९-२०२० चे सालचे अंदाजपत्रकावर सभेमध्ये झालेल्या सविस्तर चर्चेप्रमाणे **(सोबत जोडलेल्या तक्त्यामध्ये** ) दर्शविल्यानुसार अंदाजीत जमा खर्चाच्या रकमा फेरफार करणेस तसेच नागरिकांना महत्वपूर्ण नागरी सुविधा देण्यासाठी आवश्यक ती तरतुद करणेस ही सभा सर्वानुमते मंजूरी देणे बाबत शिफारस करीत आहे.

**तसेच**

* अंदाजपत्रकाच्या पुस्तकावरील हिंदु ह्रदय सम्राट बाळासाहेब ठाकरे भवन हे नाव पुसट झाले आहे ते पुढील छपाई करताना ठळक करण्यात यावे.

* सर्वसाधारण कर वसुलीमध्ये वस्तुनिष्ठपणाच्या माध्यमातून उत्पन्नाचे स्त्रोत वाढणार असल्याने सर्वसाधारण करामध्ये २० टक्के वाढ सुचविणेस ही सभा मान्यता देत आहे.

* बिगरशेती करतांना महानगरपालिका हद्दी मध्ये बिगरशेती जामीनीवर टॅक्स लावणे अपेक्षित आहे.मालमत्ता सध्या शेती असून बिगरशेतीचे प्रस्ताव सादर करतांना त्यांचेकडून कोणतेही शुल्क आकारले जात नाही असे निदर्शनास येत आहे.या करीता लेखाशिर्ष मध्ये रू.१ कोटी ४० लाख तरतुद करण्यात यावी.

* शहरातील इमारतींच्या संख्येमध्ये मोठया प्रमाणात वाढ होत आहे.त्या दृष्टीने अग्नीशमन विभागाकडील "ना हरकत प्रमाणपत्र " या लेखाशिर्षा मध्ये रू.५ लाखांनी वाढ करण्यात यावी.
* नवीन वैद्यकीय व्यावसायीकांचा शोध घेवून मुंबई नर्सिग होम ॲक्ट फि पासून मिळणा-या उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी.या लेखाशिर्षा मध्ये रू.५ लाखाने वाढ सुचविण्यात येत आहे.
* पर्यवेक्षण (आरोग्य)आकस्मीत खर्चामध्ये रूपये २ लाखांनी वाढ करण्यात यावी.
* नेहरू मार्केट व प्रोफेसर कॉलनी चौक तसेच बेग पटांगण ,वसंत टॉकिज समोरील जागेत महानगरपालिका अथवा बी.ओ.टी. तत्वावर गाळयांचे बांधकाम करून भाडेतत्वावर देण्यात यावेत.
* गाळे हस्तांतरणाची प्रक्रिया त्वरीत राबवून गाळे हस्तांतरण फी या लेखाशिर्षामध्ये रू.५० लाखाची वाढ सुचविण्यात येत आहे.
* अनाधिकृत बांधकाम नियमानुकुल करणे या लेखाशिर्षा मध्ये रू.३ कोटी ५० लाखाने वाढ करण्यात यावी.
*. मालमत्ता नांव नोंदणी फि या लेखाशिर्षा मध्ये रू.५० लाखाने वाढ सुचविण्यात येत आहे
* "गुंठेवारी विकास नियमिती करणे " यालेखाशिर्षामध्ये रूपये ४ लाख वाढ करण्यात यावी.
*जाहिरात बोर्ड जागा भाडे या लेखाशिर्षाअंतर्गत रक्कम रूपये ६लाख रूपयांनी वाढ करण्यात यावी.
* भाडेतत्वावर दिलेल्या शाळाखोल्यामधील थकबाकीदारांवर कडक करावाई करण्यात येवून मनपा शाळा भाडेपासून उत्पन्न या लेखाशिर्षातंर्गत रू.२० लाखाची वाढ करण्यात यावी.
* पे ॲण्ड पार्क या लेखाशिर्षामध्ये मोठया प्रमाणात उत्पन्न मिळणार असल्याने या लेखाशिर्षा मध्ये १० लाख रूपयांची तरतुद दर्शविण्यात यावी.
*मोबाईल टॉवर प्रशासकिय शुल्क या लेखाशिर्षामध्ये रू.२५ लाख रूपयांची वाढ सुचविण्यात येत आहे.
*मोबाईल टॉवर दंडात्मक कारवाई या लेखाशिर्षा अंतर्गत रू.५० लाखाची वाढ करण्यात यावी.
* गॅन्ट्रीज रॉयल्टी या लेखाशिर्षा मध्ये रू.२० लाखाने वाढ सुचविण्यात येत आहे.
*रस्ता फोडणे, जोडणे वसुली व बांधकाम इतर या लेखाशिर्षा मध्ये रूपये १ कोटी रूपयांनी वाढ करण्यात यावी.
*डॉक्टरांकडून जीव वैद्यकीय कचरा संकलन करणे,वाहतुक करणे,प्रक्रीया करणे व विल्हेवाट करणे इत्यादी कामा करीता आकारण्यात येणा-या दरामध्ये वाढ झालेली असल्याने जैव वैद्यकीय कचरा विल्हेवाट या लेखाशिर्षा मध्ये रू.१० लाखांनी वाढ करण्यात यावी.
*खाजगी तत्वावर कचरा संकलन वाहतुक निविदा झाली असल्याने घनकचरा संकलन व वाहतुक अंतर्गत मनपा वाहन भाडेपासून उत्पन्नामध्ये रू.५० लाखांनी वाढ सुचविण्यात येत आहे.
*मा.शासनाने पारित केलेल्या जी.आर.नुसार व एफ.एस.आय.देणे करीता अतिरीक्त चटई क्षेत्रे निर्देशांक पोटी प्रिमियम या लेखाशिर्षा मध्ये रू.१ कोटीने वाढ करण्याची शिफारस करण्यात येत आहे.
* सामान्य प्रशासन विभाग क्र.८ मधील लेखाशिर्षामध्ये "महाराष्ट्र दिन, स्वातंत्र्य दिन व सत्कार समारंभ खर्च" बदल करून "महाराष्ट्र दिन, स्वातंत्र्य दिन व सत्कार समारंभ चहापान खर्च" असे लेखाशिर्ष दर्शविण्यांत यावे. व या लेखाशिर्षातंर्गत रूपये ५० हजाराने वाढ करण्यात यावी.
* नगरसचिव विभाग,आकस्मिक खर्च /झेरॉक्स खर्च असे लेखाशिर्ष दर्शविण्यात यावे.तसेच मा.महासभा,मा.स्थायी समिती ,इतर प्रभाग समिती,अतीथ्री चहापान खर्च या लेखाशिर्षामध्ये बदल करून मा.महासभा,मा.स्थायी समिती ,इतर प्रभाग समिती, अतीथ्री चहापान,अल्पोपहार खर्च दर्शविण्यात येवून या लेखाशिर्षाअंतर्गत रक्क्कम रूपये ४ लाखांची वाढ करण्यात यावी.

* अहमदनगर शहराचा वर्धापन दिन साजरा करणे,शहरातील रस्तयांवर सचित्र दिशादर्शक फलक बसविणे , नगर दर्शन उपक्रम राबविणे या कामांकरीता "नगर शहर पर्यटन विकास "नवीन लेखशिर्ष निर्माण करण्यात येउन त्यामध्ये रूपये ५ लाख रकमेची तरतूद करण्यात यावी.

* अमृत योजने अंतर्गत शहरातील विविध भागातील उदयाने विकसीत करणे करीता आरक्षीत ठिकाणी संरक्षण भिंत किंवा तारकंपैांड करणे अवश्यक असल्याने रक्कम रूपये ३० लाख तसेच सावेडी भागातील निर्मलनगर उदयान विकासीत करणे करिता रूपये १० लाख अशी एकुण रूपये ४० लाखांनी "उद्यान विकास व तारकंपौड " या लेखाशिर्षा अंतर्गत वाढ करण्यात यावी.

* गंगाउद्यान देखभाल-दुरूस्ती करीता देण्यात आलेल्या ठेकेदार संस्थेची मुदत संपल्याने तात्काळ निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी.तो पर्यत एखादया सामाजिक संस्थेला देखभाल-दुरूस्ती करीता देण्यात यावी.

* नविन प्रशासकिय ईमारत या लेखाशिर्षा अंतर्गत रू.३ लाखांनी वाढ करण्यात यावी.

* " विकास भार निधीतुन खर्च " या लेखाशिर्षाअंतर्गत रूपये १ कोटी २५ लाख दर्शविण्यात आली असून या लेखाशिर्षा मध्ये रू. १ कोटी ७५ लाख वाढ करण्यात यावी.

* " बांधकाम परवानगी अंतर्गत सुधारणा " या लेखाशिर्षा मध्ये ५०लाख रूपयांनी वाढ करावी.

* "रेखांकनमधील अंतर्गत सुधारणा (ले आउट धारक ) " या लेखाशिर्षामध्ये रूपये ५०लाखांनी वाढ सुचविण्यात येत आहे.

*विद्युत साहित्य खरेदी या लेखाशिर्षामध्ये रूपये १०लाखाची वाढ करण्यात यावी.

*अनाधिकृत नळ कनेक्शन ची शोध मोहीम वाढवून उत्पन्नामध्ये वाढ करण्यात यावी. अनाधिकृत नळ निमानुकुल करणे या लेखाशिर्षाअंतर्गत रू.२ कोटीची वाढ करण्यात यावी.

*पाणी विक्री जमा या लेखाशिर्षा मध्ये रू.१ कोटी वाढ करण्यात यावी.

* सावेडी गांवठाण सिटी सर्व्हे साठी तरतुद रू.२० लाखांनी कमी दर्शविण्यात यावी.

* स्त्री जन्माचे स्वागत या लेखाशिर्षा अंतर्गत रू.२ लाख वाढ करण्यात यावी.

*हिवताप प्रतिबंधक योजना कंत्राटी पध्दतीने फवारणी करणे रू.१० लाख वाढ करण्यात यावी.

*गुच्छ व हार खरेदी रू.१ लाख तरतुद वाढविण्यात यावी.

*वॉर्ड विकास निधी या लेखाशिर्षाअंतर्गत रू. ३ कोटी ९३ लाखाची तरतुद करण्यात यावी त्यामुळे प्रभागात कमीत कमी रू.१३ लाखाची कामे करता येतील.

*मनपा कर्मचारी घरकुल योजना या लेखाशिर्षा मध्ये रक्कम रूपये १० लाखाची तरतुद करण्यात यावी.

*मा.महापौर शहर विकास निधी रू.३ कोटी, मा.उपमहापौर शहर विकास निधी रू.५०लाख, मा.स्थायी समिती सभापती शहर विकास निधी रू.५० लाख, सभापती महिला व बाल विकास निधी रू.१५ लाख, उपसभापती महिला व बाल कल्याणस निधी रू. १० लाख, मा.विरोधी पक्ष नेता शहर विकास निधी रू.२५ लाख तसेच मा.सभागृह नेते शहर विकास निधी रू.२५ लाखाची तरतुद दर्शविण्यात यावी.

*मा.महापौर शहर विकास निधी, मा.उपमहापौर शहर विकास निधी, मा.स्थायी समिती सभापती शहर विकास निधी , सभापती महिला व बाल विकास निधी , उपसभापती महिला व बाल कल्याणस निधी , मा.विरोधी पक्ष नेता शहर विकास निधी ,मा.सभागृह नेते शहर विकास निधी या लेखाशिर्षा अंतर्गत झालेल्या कामाचे देयके अर्थ विभागाकडे प्राप्त झाल्या नंतर ती प्राधान्याने अदा करण्यात यावी.

* "सेल्फी पॉईट करणे " या लेखाशिर्षामध्ये रक्कम रूपये १५ लक्ष रूपयांची तरतुद करण्यात यावी.

* सावेडी भागातील प्रोफेसर चौक ते भिस्तबागमहाल रोड , कसबे वस्ती पर्यतचा रस्ता मॉडेल रस्ता विकासीत करणेकरिता "मॉडेल रस्ता" या लेखाशिर्षातंर्गत रू.५०लाखाची तरतुद करण्यात यावी.

* मोबाईल टॉवर उत्पन्नातुन विकास कामे करणे या लेखाशिर्षा अंतर्गत रू.५०लाखांची वाढ करावी.

*नळ धारकांकडून जमा पाणीपट्टी रक्कम रूपये १  कोटी ६२ लाख ५०हजार ने वाढ करण्यात यावी.

* अग्नीशमन सुरक्षासाहित्य खरेदीमध्ये रूपये ३लाख ४४ हजार रूपयांनी वाढ करण्यात यावी.

* प्रभाग क्रमांक १० मधिल शनिगल्ली ,इदगाह मैदान अंतर्गत भागामध्ये रस्ता कॉक्रीटीकरण करणे व बंद पाईप गटर करणे या कामाकरीता रू.२५ लाखचा खर्च  "अतिरीक्तचटई क्षेत्र निर्देशांकपोटी प्रिमीयम रकमेतून कामे करणे " या लेखाशिर्षा अंतर्गत भागविण्यांत यावा.

* बोल्हेगाव-सावेडी भागातील प्रभाग क्र.७ बोल्हेगांव गांवठाण म्हैसमाळे घर ते धनंजय विविध वस्तु भांडार ते भिंगारदिवे मळा रस्ता मजबुतीकरणासह डांबरीकरण करणे करीता रू.३० लाखचा खर्च "अतिरीक्तचटई क्षेत्र निर्देशांकपोटी प्रिमीयम रकमेतून कामे करणे " या लेखाशिर्षा अंतर्गत भागविण्यंत यावा.

*प्रभाग क्रमांक १० मधील खानका शरीफ मध्ये नसिम घर ते सय्यद बेकरी ते डॉ.जाकिर ते हाजी शेरआली घरापर्यतचा रस्ता डांबरीकरण व बंदपाईप गटर (३००mm) करणे करीता अंदाजीत रक्कम रूपये १५ लाख "अनाधिकृत बांधकाम नियमाकूल करणे " या लेखाशिर्षा अंतर्गत जमा होणा-या रकमेतुन भागविण्यात यावा.

*प्रभाग क्रमांक ७ मधील बोल्हेगांव ते सावेडी खंडोबा मंदिर पर्यत लाईट एल.ए.डी. टयुबलर पोल लावणे रूपये ३० लाख सदरचा खर्च "विकास भार निधी" अंतर्गत भागविण्यात यावा.

*अहमदनगर महानगरपालिकेच्या आर.टी.ओ.टाकी जवळील मोकळया जागेत अदयावत जिम बांधणे करीता रक्कम रूपये २० लाखाचा खर्च "नवीन इमारत" या लेखाशिर्षामधुन भागविण्यात यावा.

* "क्रीडा व संस्कृतीक विभाग " पान क्र.३१ मधील अ.क्र.३ मधिल "क्रीडा साहित्य खरेदी " या लेखाशिर्षा मध्ये रक्कम रूपये १५ लाख रूपयांची वाढ करून , नव्याने निर्माण होणा-या जीम करीता अंदाजे रक्कम रूपये १५ लाखांचे साहित्य खरेदी करून बसविण्यात यावे.

* सावेडी भागातील शिवनगर अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे, सावेडी भागातील श्रीकृष्णनगर अंतर्गत डांबरीकरण करणे, सावेडी भागातील ज्ञानेश्वर नगर साईदिपनगर व शिरसाठ मळा अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे, प्र.क्र.१ गणेश डेअरी ,गावडे मळा ते राजनंदिनी हॉटेल ते तपोवन रोड पर्यतचा रस्ता मजबुतीकरणासह डांबरीकरण करणे अनुक्रमे रक्कम रूपये २० लाखांची तरतुद करण्यात यावी.सदरकामाचा खर्च रस्ते डांबरीकरण व नुतनीकरण या लेखाशिर्षाअंतर्गत रक्कम रूपये ६०लाख ने वाढ करण्यात यावी.

*अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये बहुतेक प्रभागांमध्ये अल्पसंख्यांक बहुल वस्त्या असून तेथील भागांच्या नागरी समस्या मोठया प्रमाणावर आहे.या करीता "अल्पसंख्यांक बहुल वस्ती सुधारणा "  हे नविन लेखाशिर्षा निर्माण करून त्या अंतर्गत रक्कम रूपये ५० लाखांची तरतुद करण्यात यावी.

*अमरधाम येथील हस्ती सुरक्षीत ठेवण्याकरीता लॉकर रूम व पाण्याची टाकी करीता "स्मशान भुमी विकसीत करणे "या लेखाशिर्षातंर्गत रू १५ लाखाने वाढ करण्यात यावी.

*"उल्लेखनिय कार्याबद्दल गौरव"या लेखाशिर्षामध्ये रूपये १ लाख रूपयांनी वाढ करण्यात यावी.

* "उल्लेखनिय कार्याबद्दल गौरव" या लेखाशिर्षा अंतर्गत राष्ट्रपती मा.प्रणव मुखर्जी यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला. दिव्यांग चि.अक्षय सुनिल वैद्य याचा महानगरपालिकेमार्फत सत्कार करून त्यास उत्तेजनार्थ रक्कम रूपये ५० हजार देवून गौरव करण्यात यावा.

*सामाजिक संस्थांना देणगी या लेखाशिर्षामध्ये रूपये ६ लाख तरतूद करण्यात यावी. रसिक ग्रुप,अ.नगर व नगर जल्लेष (ट्रस्ट) अ,नगर या सामाजिक संस्थांना मागणी पत्रानुसार अनुक्रमे रूपये १लाख ५० हजार देणगी देण्यास मान्यता देण्यात येत आहे. याबाबत संबंधीत संस्थाकडून कागदपत्राची पुर्तता करून प्रशासकीय मान्यता घेण्यात यावी. सदरचा खर्च सामाजिक संस्थांना देणगी या लेखाशिर्षातंर्गत करण्यात यावा.

*महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचा-यांना ७वा वेतन आयोग लागू करण्याकरीता आस्थापनावरील वेतनाच्या प्रत्येक विभागाच्या लेखाशिर्षाअंतर्गत ७ टक्के प्रमाणे वाढ करण्यात यावी.

याकरीता येणा-या रकमेची तरतुद करण्यात यावी.

*मा.शासनाकडुन विविध योजने अंतर्गत सन २०१९-२०२० करिता मुलभूत /प्राथमिक सुविधा विकास निधी,रस्ता अनुदान,दलितवस्ती सुधार योजना,महाराष्ट्र सुवर्ण नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) ,नागरी दलितेतर वस्ती सुधार योजना,अल्पसंख्यांक बहुलक्षेत्र विकास निधी नाविन्यपूर्ण योजने अंतर्गत विकास कामे,आदी मा.शासनाच्या निधीतील कामे सुचविण्यासाठी मा.महापौर यांना सर्वानुमते अधिकार देण्यात येत आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ नुसार सन २०१८-२०१९ चे सुधारित अंदाजपत्रकातील तरतुदींची त्वरीत अंमलबजावणी करण्यात यावी.

सन २०१९-२०२०अंदाजपत्रकाच्या प्रती छापून घेवुन अहमदनगर महानगरपालिका सदस्यांना देण्यांत याव्यात खर्च मंजूर.

वरीलप्रमाणे सुचविलेल्या दुरूस्त्या शिफारसीसह सन २०१८-२०१९ चे सुधारित व सन २०१९-२०२० सालचे बाबवार अंदाजपत्रकास मान्यता व शिफारशी सह मा.महानगरपालिका सभे पुढे सादर.

ही अर्थसंकल्पावर शिफारशी करण्याकरीताची सभा असल्याने या सभेचे इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता या सभेतील ठरावानुसार कार्यवाही करण्यात यावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.कुमार वाकळे सही /- अनुमोदक :- मा.श्री.अविनाश घुले सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-

मा.श्री. शेख मुदस्सर जहाँगीर,
सभापती, स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**सोबत** :- सन २०१९-२०२० सालचे मुळ अंदाजपत्रकामध्ये केलेल्या बदलांचा तक्ता

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**

**मा.स्थायी समितीने मंजूर केलेला सन२०१८-२०१९चा सुधारीत अर्थसंकल्प (आकडे लाखात)**

**सुरवातीची शिल्लक (दि.१/०४/२०१८)............................................ ८६३.५५**

**एकुण जमा.................................................................................. ५१४६५.२०**

**सुरवातीचे शिलकेसह एकुण जमा................................................ ५२३२८.७५**

**एकुण खर्च................................................................................. ५१९८५.०२**

**अखेरची अंदाजे शिल्लक (दि. ३१/३/२०१९).........................................३४३.७३**

| अ. नं. | लेखाशिर्ष (जमा बाजू ) सन २०१८-१९ | मा.आयुक्त यांनी केलेली तरतुद | मा.स्थायी समितीने केलेला बदल | | मा.स्थायी समिती सभेने मंजूर केलेली तरतुद |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | पर्यटनासाठी पायाभूत सोयीसुविधा पुरविणे अनुदान | ०.०० | १०.०० | | १०.०० |
| २ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान अनुदान | ३००.०० | ७०.०० | | ३७०.०० |
| ३ | शासकीय विमा | १२.०० | १४.०० | | २६.०० |
| | **एकुण** | **३१२.००** | **९४.००** | **०.००** | **४०६.००** |
| | | | | | |

| अ. नं. | लेखाशिर्ष (खर्च बाजू ) सन २०१८-१९ | मा.आयुक्त यांनी केलेली तरतुद | मा.स्थायी समितीने केलेला बदल | | मा.स्थायी समिती सभेने मंजूर केलेली तरतुद |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | पेन्शन फंडाकडे वर्ग | २९००.०० | १२०.०० | | ३०२०.०० |
| २ | पाचवे/सहावे वेतन आयोग फरक ( पेन्शनर ) | २२७.०० | | १३५.०० | ९२.०० |
| ३ | आकसिक खर्च (साप्रवि) | १.६९ | ०.१० | | १.७९ |
| ४ | आकस्मिक खर्च (नगररचना) | ०.०० | २.५० | | २.५० |
| ५ | बेवारस प्रेतांची विल्हेवाट करणे | ३.८४ | ०.४० | | ४.२४ |
| ६ | कर्मचारी मानधन (माध्यमिक शिक्षण) | ५.७१ | १.०० | | ६.७१ |
| ७ | पर्यटनासाठी पायाभूत सोयीसुविधा पुरविणे अनुदान | ०.०० | १०.०० | | १०.०० |
| ८ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान अनुदान | ३००.०० | ७०.०० | | ३७०.०० |
| ९ | तांत्रिक लेखापरीक्षण फी | ०.०० | ११.०० | | ११.०० |
| १० | शासकीय विमा | १२.०० | १४.०० | | २६.०० |
| | **एकुण** | **३४५०.२४** | **२२९.००** | **१३५.००** | **३५४४.२४** |

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर**

**मा. स्थायी समितीने मंजूर केलेला सन २०१९-२०२० चा अर्थसंकल्प (आकडे लाखात)**

**सुरवातीची शिल्लक (दि.१/०४/२०१९)..........................................३४३.७३**

**एकुण जमा......................................................................... ७७७११.५०**

**सुरवातीचे शिलकेसह एकुण जमा............................................. ७८०५५.२३**

**एकुण खर्च........................................................................ ७७७४०.११**

**अखेरची अंदाजे शिल्लक (दि. ३१/३/२०२०).......................................३१५.१२**

| अ. नं. | लेखाशिर्ष (जमा बाजू ) सन २०१९-२० | मा.आयुक्त यांनी केलेली तरतुद | मा.स्थायी समिती ने केलेला बदल | | मा.स्थायी समिती सभेने मंजूर केलेली तरतुद |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | संकलीत कर | ३१००.०० | ६२०.०० | | ३७२०.०० |
| २ | बिगरशेती जमिनीवर कर | ०.०० | १४०.०० | | १४०.०० |
| ३ | ना हरकत प्रमाणपत्र (अगिशमन) | १.०० | ५.०० | | ६.०० |
| ४ | मुंबई नसिंग होम ॲाक्ट फी | ०.५० | ५.०० | | ५.५० |
| ५ | गाळे हस्तांतरण फी | १००.०० | ५०.०० | | १५०.०० |
| ६ | अनाधिकृत बांधकाम नियमानुकूल करणे | १००.०० | ३५०.०० | | ४५०.०० |
| ७ | मालमत्ता नाव नोंदणी फी | ३५०.०० | ५०.०० | | ४००.०० |
| ८ | गुंठेवारी विकास नियमित करणे | ४.०० | ४.०० | | ८.०० |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| **९** | जाहिरात बोर्ड जागे भाडे | ८.०० | ६.०० | | १४.०० |
| **१०** | मनपा शाळा भाडेपासून उत्पन्न | ५०.०० | २०.०० | | ७०.०० |
| **११** | पे ॲण्ड पार्कपासुन उत्पन्न | १२.४५ | १०.०० | | २२.४५ |
| **१२** | मोबाईल टॉवर प्रशासकीय शुल्क | ७५.०० | २५.०० | | १००.०० |
| **१३** | मोबाईल टॉवर दंडात्मक कारवाईपासुन उत्पन्न | २४.५० | ५०.०० | | ७४.५० |
| **१४** | गॅट्रीज रॉयल्टी | १.५० | २०.०० | | २१.५० |
| **१५** | रस्ता फोडणे, जोडणे वसुली व बांधकाम इतर | २५०.०० | १००.०० | | ३५०.०० |
| **१६** | जैव वैद्यकीय कचरा विल्हेवाट | ३०.०० | १०.०० | | ४०.०० |
| **१७** | घनकचरा संकलन व वाहतूक अंतर्गत मनपा भाडेपासुन उत्पन्न | ५०.०० | ५०.०० | | १००.०० |
| **१८** | अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक पोटी प्रिमियम | २५०.०० | १००.०० | | ३५०.०० |
| **१९** | विकास भार | ५००.०० | १७५.०० | | ६७५.०० |
| **२०** | बांधकाम परवानगी अंतर्गत सुधारणा | १४.०० | ५०.०० | | ६४.०० |
| **२१** | रेखांकन अंतर्गत सुधारणा (ले आऊटधारक) | १५०.०० | ५०.०० | | २००.०० |
| २२ | अनाधिकृत नळ नियमानुकूल करणे | १२५.०० | २००.०० | | ३२५.०० |
| २३ | पाणी विक्री जमा | १७५.०० | १००.०० | | २७५.०० |
| २४ | नळधारकाकडून जमा पाणीपट्टी | १५००.०० | १६२.५० | | १६६२.५० |
| | **एकुण** | **६८७०.९५** | **२३५२.५०** | **०.००** | **९२२३.४५** |

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

| अ. नं. | लेखाशिर्ष (खर्च बाजू ) सन २०१९-२० | मा.आयुक्त यांनी केलेली तरतुद | मा.स्थायी समिती ने केलेला बदल | | मा.स्थायी समिती सभेने मंजूर केलेली तरतुद |
|---|---|---|---|---|---|
| | | | **वाढ** | **घट** | |
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** |
| १ | महाराष्ट्र दिन,स्वातंत्र्य दिन व सत्कार समारंभ चहापान खर्च | १.०० | ०.५० | | १.५० |
| २ | आकस्मिक खर्च (नगरसचिव विभाग) | ३.०० | ४.०० | | ७.०० |
| ३ | आकस्मिक खर्च (आरोग्य (पर्यवेक्षण) विभाग) | ५.०० | २.०० | | ७.०० |
| ४ | अंतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक पोटी प्रिमियम | २००.०० | १००.०० | | ३००.०० |
| ५ | नगर शहर पर्यटन विकास | ०.०० | ५.०० | | ५.०० |
| ६ | उद्यान विकास व तार कंपौंड | १०.०० | ४०.०० | | ५०.०० |
| ७ | विकास भार | १२५.०० | ४३.७५ | | १६८.७५ |
| ८ | बांधकाम परवानगी अंतर्गत सुधारणा | १४.०० | ५०.०० | | ६४.०० |
| ९ | रेखांकन अंतर्गत सुधारणा (ले आऊटधारक) | १५०.०० | ५०.०० | | २००.०० |
| १० | विद्युत साहित्य खरेदी | ७५.०० | १०.०० | | ८५.०० |
| ११ | सावेडी गावठाण सिटी सर्व्हे | ६०.०० | | २०.०० | ४०.०० |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| १२ | स्त्री जमाचे स्वागत करणे | ०.०० | २.०० | | २.०० |
| १३ | हिवताप प्रतिबंधक योजना कंत्राटी पध्दतीने फवारणी करणे | २०.०० | १०.०० | | ३०.०० |
| १४ | गुच्छ व हार खरेदी | ०.५० | १.०० | | १.५० |
| १५ | वॉर्ड विकास निधी | ०.०० | ३९३.०० | | ३९३.०० |
| १६ | मनपा कर्मचारी घरकुल योजना | ०.०१ | १०.०० | | १०.०१ |
| १७ | मा. महापौर शहर विकास निधी | ०.०० | ३००.०० | | ३००.०० |
| १८ | मा.उपमहापौर शहर विकास निधी | ०.०० | ५०.०० | | ५०.०० |
| १९ | मा. सभापती स्थायी समिती शहर विकास निधी | ०.०० | ५०.०० | | ५०.०० |
| २० | मा. सभापती महिला व बालकल्याण विकास निधी | ०.०० | १५.०० | | १५.०० |
| २१ | मा.उपसभापती महिला व बालकल्याण विकास निधी | ०.०० | १०.०० | | १०.०० |
| २२ | मा. विरोधी पक्ष नेता शहर विकास निधी | ०.०० | २५.०० | | २५.०० |
| २३ | मा. सभागृह नेता शहर विकास निधी | ०.०० | २५.०० | | २५.०० |
| २४ | सेल्फी पॉईट करणे | ०.०० | १५.०० | | १५.०० |
| २५ | मॉडेल रस्ता विकसीत करणे | ०.०० | ५०.०० | | ५०.०० |
| २६ | मोबाईल टॉवर उत्पन्नातून विकास कामे करणे | ०.०० | ५०.०० | | ५०.०० |
| २७ | उल्लेखनीय कार्याबद्दल गौरव करणे | २.०० | १.०० | | ३.०० |
| २८ | सामाजिक संस्थांना देणगी | ०.०० | ६.०० | | ६.०० |
| २९ | रस्ते डांबरीकरण व नुतनीकरण | ५.०० | ६०.०० | | ६५.०० |
| ३० | नविन इमारती | १००.०० | २०.०० | | १२०.०० |
| ३१ | क्रीडा साहित्य खरेदी | ०.०० | १५.०० | | १५.०० |
| ३२ | विकास भार निधीतून खर्च (नगररचना भून संपादन) | ३७५.०० | १३१.२५ | | ५०६.२५ |
| ३३ | अल्पसख्यांक बहुल वस्ती सुधारणा | ०.०० | ५०.०० | | ५०.०० |
| ३४ | स्मशानभूमी सुधारणा व नविन स्मशानभूमी | ५.०० | १५.०० | | २०.०० |
| ३५ | आयुक्त व प्रमुख कार्यालय वेतन | २९०.०० | २०.३० | | ३१०.३० |
| ३६ | अभिलेख कक्ष वेतन | २२.०० | १.५४ | | २३.५४ |
| ३७ | भांडार विभाग वेतन | ४०.०० | २.८० | | ४२.८० |
| ३८ | आस्थापान विभाग व मागासवर्ग कक्ष वेतन | ९३.०० | ६.५१ | | ९९.५१ |
| ३९ | विधी विभाग वेतन | १८.०० | १.२६ | | १९.२६ |
| ४० | कामगार विभाग वेतन | १६.०० | १.१२ | | १७.१२ |
| ४१ | महिला व बाल कल्याण व सुवर्णजयंती विभाग वेतन | १४.०० | ०.९८ | | १४.९८ |
| ४२ | नगरसचिव विभाग वेतन | २१०.०० | १४.७० | | २२४.७० |
| ४३ | संगणक विभाग वेतन | ४७.०० | ३.२९ | | ५०.२९ |
| ४४ | माहिती व जासंपर्क विभाग वेतन | २८.०० | १.९६ | | २९.९६ |
| ४५ | ग्रंथपाल यांचे पथक वेतन | २९.०० | २.०३ | | ३१.०३ |
| ४६ | एल. बी. टी विभाग वेतन | २२८.०० | १५.९६ | | २४३.९६ |
| ४७ | माहिती व सुॅविधा केंद्र वेतन | ५४.०० | ३.७८ | | ५७.७८ |
| ४८ | प्रभाग समिती कार्यालये (४ प्रभाग) वेतन | ३२०.०० | २२.४० | | ३४२.४० |
| ४९ | मुल्य निर्धारण व कर संकलन विभाग वेतन | ५१०.०० | ३५.७० | | ५४५.७० |
| ५० | मुख्य लेखा व वित्त विभाग वेतन | १२०.०० | ८.४० | | १२८.४० |
| ५१ | लेखापरीक्षण विभाग वेतन | ५२.०० | ३.६४ | | ५५.६४ |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| ५२ | क्रीडा व सांस्कृतिक विभाग वेतन | १८.०० | १.२६ | | १९.२६ |
| ५३ | सुरक्षा विभाग वेतन | १०.०० | ०.७० | | १०.७० |
| ५४ | उद्यान विभाग वेतन | ५१६.०० | ३६.१२ | | ५५२.१२ |
| ५५ | बांधकाम व प्रकल्प(झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन)विभाग वेतन | ११००.०० | ७७.०० | | ११७७.०० |
| ५६ | पाणी पुरवठा विभाग वेतन | ११००.०० | ७७.०० | | ११७७.०० |
| ५७ | नगररचना व अतिक्रमण विभाग वेतन | २५२.०० | १७.६४ | | २६९.६४ |
| ५८ | विद्युत विभाग वेतन | ३४५.०० | २४.१५ | | ३६९.१५ |
| ५९ | यांत्रिकी विभाग वेतन | १८०.०० | १२.६० | | १९२.६० |
| ६० | पर्यावरण विभाग वेतन | १२.०० | ०.८४ | | १२.८४ |
| ६१ | आरोग्य व घनकचरा व्यवस्थापन विभाग वेतन | ३७५०.०० | २६२.५० | | ४०१२.५० |
| ६२ | आरोग्य प्रशासन व व्यवस्थापन विभाग वेतन | २४०.०० | १६.८० | | २५६.८० |
| ६३ | नगर मनपा रुग्णालय व आरोग्य सेवा विभाग वेतन | ७१०.०० | ४९.७० | | ७५९.७० |
| ६४ | रक्तपेढी विभाग वेतन | ८४.०० | ५.८८ | | ८९.८८ |
| ६५ | अग्निशमन विभाग वेतन | १०५.०० | ७.३५ | | ११२.३५ |
| ६६ | मलेरिया विभाग वेतन | १५०.०० | १०.५० | | १६०.५० |
| ६७ | कुटुंब कल्याण व माता बाल संगोपन विभाग वेतन | ११५.०० | ८.०५ | | १२३.०५ |
| ६८ | आस्थापना वाढीव वेतन खर्च | ३०.०० | २.१० | | ३२.१० |
| ६९ | नविन प्रशासकीय इमारत | ०.०० | ३.०० | | ३.०० |
| ७० | अग्निशमन सुरक्षा साहित्य खरेदी | ०.०० | ३.४४ | | ३.४४ |
| | **एकुण** | **११९५४.५१** | **२३७२.५०** | **२०.००** | **१४३०२.५१** |

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**चर्चा :-**

**मा.श्री.सागर बोरुडे :-** मागील सभेपासुन नविन पायंडा पडला आहे. प्रत्येकवेळी शिष्ठमंडळ सभागृहात येते जनतेचे प्रश्न सुटले पाहिजेत. शिष्ठमंडळांसाठी आयुक्त, महापौर यांनी वेगळा वेळ दिला पाहिजे.

**मा.श्री.स्वप्नील शिंदे :-** मा.महापौर यांचे बद्दल बोराटे साहेब यांनी जे अपशब्द वापरले त्याचा मी निषेध करतो. त्यांनी माफी मागावी.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** महापौर यांनी अगोदर अपशब्द वापरले त्यांनी अगोदर माफी मागावी. मग मी माफी मागतो.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** अशा वृत्तीचा आम्ही निषेध करतो.

**मा.श्री.राहुल कांबळे :-** स्वतःची प्रतिमा आरशात पहावी. जोपर्यंत माफी नामा होत नाही. तोपर्यंत सभागृह चालू देणार नाही. भाजपा तर्फे निषेध करतो.

**मा.श्री.रविंद्र बारस्कर :-** अत्यंत खालच्या पातळीवर टिका केली ती आम्ही खपवुन घेणार नाही.

**मा.सौ.आशा कराळे :-** मा.महापौरांबद्दल अपशब्द बोलणे चूकीचे आहे.

**मा.श्री.मनोज कोतकर :-** इतक्या खालच्या पातळीवर जावून टिका करणे योग्य नाही.

**मा.महापौर सो :-** सभेचे कामकाज चालू करा.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** जो काही प्रकार घडला तो चुकीचा आहे. असे माझे वैयक्तीक मत आहे. आपण जी पत्रकार परिषद घेतली त्यात जे वाक्य वापरण्यांत आले त्यामुळे हा प्रकार घडला. मी सभागृहाच्या वतीने माफी मागतो.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :-** सभा थोडी उशीरा झाली सभागृहात प्रश्न मांडुन ते मार्गी लावता येतात.

**मा.महापौर सो :-** बजेटची मिटींग आहे. आठ दिवसात परत सभा घेवू या सभेत वेळ देता येणार नाही.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :-** काही नगरसेवकांवर गुन्हे दाखल झाले ही निंदनीय गोष्ट आहे. एका महिला नगरसेविकेवर गुन्हा दाखल झाला. त्या महिला नगरसेवकांनी म्हणणेही मांडले नव्हते तरी त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला. महिला म्हणून मी या घटनेचा निषेध करतो.

**मा.श्री.गणेश कवडे :-** दिल्लीगेट ते स्वातंत्र्यवीर सावरकर पुतळया पर्यंत रस्त्याची मा.महापौर यांनी पाहणी केली. अतिक्रमण १०० टक्के काढा परंतु एका बाजुने कारवाई करु नये जिल्हाधिकारी कार्यालया पासून सुरुवात करा.

**मा.श्री.मनोज कोतकर :-** माझ्यावरही काल खोटा गुन्हा दाखल झाला मी त्यावेळी बारामती रस्त्यावर प्रवासात होतो व इकडे गुन्हा दाखल झाला.

**मा.महापौर सो :-** विषयांचे वाचन करावे.

**मा.श्री.शाम नळकांडे :-** अमरधाम मध्ये मनपा लाईट पूरवू शकत नाही. परवा आम्ही गाडीचा लाईट लावून अंत्यविधी केला. सभागृहात आमचा आवाज दाबला जातो.

**मा.महापौर सो :-** सभापती स्थायी समिती अंदापत्रक सादर करा.

मा.सभापती स्थायी समिती यांनी अंदाजपत्रक महासभेत सादर केले.

**श्री.राजेंद्र गायकवाड :-** मा.सभापती यांचे वतीने त्यांचे मनोगत वाचन करतो.

**मा.महापौर सो :-** सभापती तुमच्या वतीने वाचन करु द्यायचे का.

**सभापती स्थायी समिती :-** वाचन करु द्या.

मा.सभापती, स्थायी समिती यांचे मनोगताचे वाचन केले.

**मा.श्री.सचिन शिंदे :-** अमरधाममध्ये अंत्यविधी, मोबाईल टॉवर मध्ये करावा लागला गैरसोय टाळावी . लाईट चालू बंद करण्याचे काम वायरमनचे आहे. ते काम नागरीक करतात लाईट चालू बंद करतांना एखादी दुर्घटना घडल्यास त्यास कोण जबाबदार धरणार. आम्ही महानगरपालिकेस जबाबदार धरु.

**मा.श्री.महेंद्र गंधे :-** मनोगतात मा.दिलीप गांधी यांचे नाव टाकण्याचे राहिलेले आहे. ते टाकण्यांत यावे. मा.खासदार.श्री.सुजय विखे व मा.खासदार श्री.सदाशिव लोखंडे यांचे अभिनंदनाचा ठराव मी मांडतो.

**मा.महापौर सो :-** अंदाजपत्रक अभ्यासासाठी आपल्याला आता किती वेळ पाहीजे.

**मा.श्री.रविंद्र बारस्कर :-** आता भैय्या गंधे यांनी जो ठराव मांडला त्यास मी अनुमोदन देतो.

**मा.महापौर सो :-** घेण्यात येईल.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** शहरात पावसाळा चालू झालेला आहे. लाईट संदर्भात माझे प्रभागात ठेकेदारांनी २ हायमॅक्स लावले त्यांच्या कुठल्याही बीलावर सह्या होत नाहीत. त्यामुळे ठेकेदार लावलेले साहित्य काढुन परत नेणार आहेत. नविन ले-आउट मंजूर करता व हा विषय मार्गी लावत नाही.

**मा.महापौर सो :-** हा विषय मार्गी लावू.

**मा.श्रीमती.सुनिता कोतकर :-** एकमेकांवर चिखलफेक करु नका सध्या कामांची गरज आहे. वेळ महत्वाचा आहे.

**मा.श्री.विनीत पाऊलबुधे :-** सभागृहाला शिस्त लावा. हात वर करुन परवानगी घेवून बोलायला लावा. मध्ये कोणी बोलत असेल तर तुम्हाला सभागृहाबाहेर काढण्याचा अधिकार आहे. आपल्याबद्दल चर्चा चांगली झालेली ऐकायची असेल तर सभागृहात शिस्त पाळायला लावा.

**मा.महापौर सो :-** सभा केंव्हा घ्यावी.

**मा.महापौर सो :-** सदस्यांना अभ्यासासाठी वेळ दिलेली आहे आज सभा तहकुब करुन उद्या बुधवार दिनांक २६/०६/२०१९ रोजी दुपारी १.०० वाजता सुरु होईल.

बुधवार दिनांक २६/०६/२०१९ रोजी दुपारी १.०० वाजता तहकुब सभा पुन्हा सुरु.

**मा.महापौर सो :-** सभेचे कामकाज चालू करा.

**मुख्यलेखाधिकारी श्री.मानकर :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड प्रकरण दोन नियम ३१ अन्वये सन २०१९-२०२० चे ७८०.५५ लाखाचे अंदाजपत्रक मा.सभापती स्थायी समिती यांनी सभागृहास सादर केले आहे. यामध्ये एकुण महसुल उत्पन्न ३९३ कोटी अपेक्षीत धरले आहे. त्यामध्ये खालील बाबी समाविष्ठ करण्यांत आल्या आहेत.

पान नं.९७ - अ ब क ड चे वाचन केले.

एकुण उत्पन्न २९८.५० गृहीत.

सुरुवातीची शिल्लक ३ कोटी,

एकुण उत्पन्न ३९३.७९ हजार दर्शविले आहे.

महसुली खर्च २५३.२१ अपेक्षीत पान नंबर ९८ अ ब क ड चे वाचन केले.

जलनिस्सारण पाणी पुरवठा ३८.२३ लाख खर्च एकुण खर्च २५३.२१ खर्च होणे अपेक्षीत

कालच अंदाजपत्रकाची प्रत दिली आहे. सर्व सन्माननीय सदस्यांनी ती वाचली असेलच.

**मा.महापौर सो :-** मीटर व्दारे रक्कम कशी दर्शविली आहे.

**श्री.काकडे ज्यु.इंजि. पा.पु. :-** तत्कालीन नगरपालिका असतांना १२ ग्रामपंचायतींना मुख्य जलवाहिनीवरुन मिटरव्दारे पाणी पुरवठा केला जात होता. जिल्हा परिषदेकडे जी रक्कम थकीत आहे. ती दर्शविण्यांत आली आहे.

**मा.महापौर सो :-** प्रत्येक वर्षी मिटर व्दारे किती रक्कम वसुल होते.

**श्री.काकडे ज्यु.इंजि. पा.पु. :-** ३ च ग्रामपंचायतीची मिटर चालू आहे. एकुण थकबाकी ६४ कोटी आहे.

**मा.महापौर सो :-** पूर्वी जर ग्रामपंचायतींना देत होतो आता आपण ग्रामपंचायतीला पाणी देत नाही. त्यामुळे लाईटबील कमी आले पाहीजे त्याचे काय नियोजन केले आहे.

**श्री.काकडे ज्यु.इंजि. पा.पु. :-** आपण जेवढी वीज वापरतो तेवढेच लाईटबील येत आहे. पाणी २० % वाढले आहे.

**मा.महापौर सो :-** २०% पाणी वाढले पण शहरात ब-याच ठिकाणी पाणी नाही.

**श्री.काकडे ज्यु.इंजि. पा.पु. :-** फेज टू चे पंप नसतांना लेव्हल नव्हती पंप बसविल्या नंतर वसंत टेकडीला ४-५ फुट लेव्हल राहते. उपनगरला फेज-२ चे काम पूर्ण झाल्यानंतर व्यवस्थीत पाणी पुरवठा होईल. शहरामधील मध्य भागात पाणी पुरवठा सुरळीत झाला आहे.

**मा.श्री.योगीराज गाडे :-** महानगरपालिका व्यवस्थित सुविधा देत नसेल तर तुम्ही शास्ती माफ करा आयुक्तांचे अधिकार आहेत. शास्ती माफी मुळे महानगरपालिकेच्या वसुली मध्ये वाढ होईल. स्थायी समितीमध्ये मी याबाबत म्हणणे मांडले आहे. यापूर्वी २ वेळा शास्ती माफ केली आहे. सर्व नगरसेवकांचे वतीने मी शास्ती माफीची मागणी करतो. बजेटमध्ये शिक्षण कर ३ कोटी दर्शविला आहे. तुम्ही तर शाळा बंद

करीत आहात महानगरपालिकेची स्टेशन रोडवरील शाळा सुरु करा. शाळा सुरु झाली नाही तर आम्ही महानगरपालिकेवर गुन्हा दाखल करु.

**मा.श्री.गणेश भोसले :-** महानगरपालिकेने मालमत्ता करासाठी खाजगी एजन्सी मार्फत सर्व्हेक्षण केले त्यासाठी आपण ५० लाख रुपये दिले. त्यापासून महानगरपालिकेचे किती उत्पन्न वाढले. फेज-२ चे बाबतीत मी वारंवार पत्र दिले त्यावर चर्चा करण्याकरीता एक स्वतंत्र बैठक लावावी सभा बोलवावी. १५० कोटींचे काय झाले हे नगरकरांना कळू द्या. कधी पाणी येणार हे कळू द्या महानगरपालिकेने फक्त पाईप आणले, खोदुन टाकले जे मेन काम होते ते झाले नाही या सगळया गोष्टीची नगरकरांना माहिती व्हावी. अशी आमची अपेक्षा आहे. पूर्ण तयारी निशी सभा बोलवा.

**मा.श्री.अमोल येवले :-** केडगांव मध्ये आजून फेज-१ चे काम पूर्ण झाले नाही नविन वसाहती झाल्या आहेत. पाण्याची सोय नाही.

**मा.महापौर सो :-** फेज-१ फेज-२ वर स्वतंत्र बोर्ड घेण्यात येईल. ८ - १५ दिवसात सभा घेवू.

**मा.श्री.राहुल कोतकर :-** गेल्या १०-१२ वर्षापूर्वी केडगांवला १२ दिवसानंतर पाणी पुरवठा व्हायचा मा.संदीप कोतकर व प्रशासनाने प्रश्न मार्गी लावला. राहिलेले १० टक्के काम ठेकेदाराचे बील निघाले नाही. त्यामुळे तो काम करीत नाही. नागरिक आमच्याकडे काम सुरु करणेबाबत मागणी करतात. महानगरपालिका म्हणते लवकरच काम सुरु होणार. आपण आदेश द्यावेत. कायनेटीक चौक परिसरात टँकरव्दारे पाणी वाटप होते. त्याठिकाणी नळाचे पाणी का जात नाही , तो प्रश्न सुटत का नाही. हा प्रश्न जर मार्गी लागला नाही तर मी उपोषणाला बसणार आहे.

**मा.सौ.सुवर्णा जाधव :-** केडगांवचा काही भाग माझ्या प्रभागात येतो तिथे पाण्याचे नियोजन काहीच नाही. कल्याण रोड टाकीचा प्रश्न लवकर मार्गी लावा. इथे येवून नागरिकांनी निवेदन दिले आहे. १५-१५ दिवस पाणी येत नाही.

**मा.सौ.पुष्पा बोरुडे :-** या अगोदर काकडे साहेबांना टँकर लावणे बाबत निवेदन दिले त्याचेही नियोजन नाही.

**मा.श्री.शाम नळकांडे :-** कल्याण रोड परिसरात १०-१५ दिवसांनी पाणी पुरवठा होतो. नगरला दिवसा आड पाणी पुरवठा व या भागात १५ दिवसांनी पाणी पुरवठा होता. हा फरक का. नव्याने बांधकाम परवानगी का देता. आहे ह्याच ठिकाणी पाणी पुरवठा देवू शकत नाही व नव्या भागाला कसा पाणी पुरवठा करणार. महानगरपालिकेकडे १० वर्ष झाले एकही जेसीबी नाही.

**मा.श्री.सचिन शिंदे :-** कल्याण रोडचे टाकीचे काम केंव्हा पूर्ण करणार.

**मा.सौ.पुष्पा बोरुडे :-** कल्याण रोडला कुठल्याही मुलभूत सुविधा नाहीत.

**मा.महापौर सो :-** सभेत सदस्यांनी मांडलेल्या पाणी प्रश्ना संदर्भात दखल घेण्यात आली असुन यासाठी स्वतंत्र सभा घेण्यांत येणार आहे. या सभेमध्ये सदस्यांचे सर्व प्रश्नांना उत्तरे मिळतील. कल्याण रोडची परिस्थिती मी पाहीलेली आहे. १० दिवसात सभा बोलवू व प्रश्न मार्गी लावू.

**मा.श्री.शाम नळकांडे :-** या समस्यांची गंभीर दखल महानगरपालिकेने घ्यावी. अन्यथा नागरिकांचे वतीने तीव्र आंदालन करण्यांत येईल.

**मा.सौ.सुवर्णा जाधव :-** आगरकर मळयातील टाकीची मोटर आठ दिवसात बंद पडते.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :-** सारसनगर मध्ये पाण्याची टाकी बांधली त्या ठिकाणी फेज-२ लाईन अंथरणेचे काम ९० टक्के झाले आहे. या लाईनवर कनेक्शन देण्याची कार्यवाही करु शकतो. त्या लाईन चालू करणे बाबत प्रशासनास आदेश द्यावेत. आमच्या प्रभागात एकच वॉलमन ३-४ दिवस डयुटी करतो. त्या

भागात वॉलमन व्यवस्था करुन द्यावी. सारसनगर पाण्याचे टाकी मधुन पाणी पुरवठा केंव्हा होईल. याची माहिती द्या.

**मा.सौ.शिला चव्हाण :-** १ जानेवारी १६ पासून ७ वे वेतन लागू झाले आहे. तो महानगरपालिकेच्या सर्व कर्मचा-यांना ७ वेतन आयोग लागू करावे.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** सर्व नगरसेवक पोटतिडकीने पाण्याचा प्रश्न मांडतात काकडे साहेबांना माहिती द्यायला सांगा. कल्याण रोडला बायपास पासून  पाणी देत होतो ते देणे बंद केल्यामुळे हा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यावेळी ४-५ दिवसातून पाणी येत होते.

**मा.श्रीमती.सुनिता कोतकर :-** वॉ.नं.१६ मध्ये वॉलमधून पाणी वाया जाते ते बंद करावे. ३-४ दिवस २४ तास पाणी चालू राहते.

**मा.सौ.सुवर्णा जाधव :-** आगरकर मळा येथील टाकीवरील मोटार वारंवार बंद पडते. पर्यायी व्यवस्था करण्यांत यावी.

**मा.श्री.गणेश कवडे :-** दुषित पाणी शोधून लिकेज काढणेसाठी कर्मचारी नाहीत. शहरात ४ ते ५ कर्मचारी आहेत. नव्याने ८-१० कर्मचारी  भरती केले तर ही समस्या मार्गी लागेल.

**मा.श्री.अविनाश घुले :-** प्रत्येक नगरसेवकाचे वॉर्डात घाण पाणी रिपेअरसाठी महानगरपालिकेकडें कर्मचारी नाही.  स्वखर्चाने मी एक ठिकाणी वॉल दुरुस्ती साठी लोक लावले. नगरपालिका असतांना वॉलमन बरोबर १०-१२ बिगारी असायचे आता बिगारी मिळत नाहीत. त्यामुळे कामास उशीर होतो.

**मा.महापौर साो :-** आउट सोर्सींगने कर्मचारी घेण्यात यावे.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** १० इंजिनियर भरतीसाठी शासनाकडे मंजूरीसाठी प्रस्ताव पाठवला आहे. किरकोळ दुरुस्तीसाठी तो प्रस्ताव पडून आहे.ती लवकर दुरुस्ती करुन प्रस्ताव मार्गी लावल्यास इंजिनियर उपलब्ध होवू शकतील. शहरात अनेक भागात लाईट नाहीत. ज्या ठेकेदारांनी पोल व फिटींग बसविण्याचे काम केले त्यांचे बीलावर स्वाक्षरी होत नाहीत. त्यामुळे त्यांनी साहित्य परत काढून घेणे बाबत प्रशासनास पत्र दिले आहे. श्री.मेहेत्रेंना दोन चार्ज दिले आहेत. मेहेत्रेंकडे प्रकल्प विभागाची जबाबदारी असतांना त्यांनी ब-यापैकी घरकुल योजना मार्गी लावल्या आहेत. असे किती अधिकारी आहेत  त्यांचेकडेस दोन-तीन चार्ज दिले आहेत.

**मा.श्री.विनित पाउलबुधे :-** पाणी विभागात इंजिनियर कमी आहेत. मेहेत्रेंची नेमकी पोस्ट काय आहे. मेहेत्रे सिव्हील इंजिनियर असुन त्यांना खत प्रकल्पाकाची जबाबदारी दिली आहे. खत प्रकल्प राबविणेची जबाबदारी आरोग्य विभागाची आहे. उपलब्ध असलेल्या  इंजिनियर यांचेकडून व्यवस्थीत काम करुन घ्या.

**मा.श्री.आसीफ सुलतान :-** प्र.क्र. ३ व ४ चे पाणी समस्या बाबत बोलतो. फेज - २ चे ९० % काम काम झाले आहे. राहिलेले काम पूर्ण होत नाही. फेज - २ चे काम लवकरात लवकर करुन नवीन टाकी स्वच्छ करुन त्यातुन पाणी पुरवठा सुरु करावा. मुकुंदनगरला काही भागात १ दिवसा आड तर काहिंना २ दिवसा आड पाणी पुरवठा होतो. हा भेदभाव दूर करावा.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :-** कसबे वस्तीला पाणी पुरवठा होत नाही. ग्रामपंचायती पासून लाईन आहे. दुसरी लाईन टाकण्याची गरज आहे. नविन पाईपलाईन टाकण्यासाठी या बजेटमध्ये तरतुद करावी. १०-१५ हजार लोकांना टँकर कसा पुरणार मी यापूर्वी पत्र दिले.

**श्री.काकडे ज्यु.इंजि. पा.पु. :-** नवीन प्रस्ताव तयार करावा लागेल.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :-** लक्ष्मी कॉलनीतील होल २ इंचाचे करावे अस्तित्वातील वसाहतींना पाणी पुरवू शकत नाही. तरी नविन वसाहतींना बांधकाम परवानगी देण्यांत येत आहे. त्या लोकांना पाणी कसे देणार. बजेटमध्ये तरतुद करण्यांत यावी.

**श्री.काकडे ज्यु.इंजि. पा.पु. :-** जिल्हा परिषदेची परवानगी घ्यावी लागेल.

**मा.श्री.शेख नजीर अ.रज्जाक :-** नगरसेवकांनी मांडलेल्या तक्रारी सोडवा. काम करुन घ्या. आंदोलन होतात. तुम्ही कामे केली तर आंदोलनाची वेळ येणार नाही. नगरसेवक वेडे आहेत का. त्यांचे मागे ४ हजार नागरीक आहेत. आयुक्त ४ महिने गणपती सारखे बसणार आहेत. ते काहीच करणार नाहीत. कामे केली नाही तर आंदोलन होणार आणि चपलाही खाव्या लागणार.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** लेखानगर पासून १५ इंची लाईन जोडली आहे या तपोवन हडकोतून ४-६ इंची लाईन सेप्रेट जाईल. तपोवन रोडला सेप्रेट लाईन द्या. कजबे वस्ती पाण्याचे प्रश्नी संजोग हॉटेल पासुन टॅब करुन द्या. महासभेत येणा-या खर्चास मंजूरी द्या. वॉलमन संख्या कमी आहे. वॉलमन पुर्णवेळ देण्याची तजविज करा. प्रशासनाने काळजी घ्यावी. नविन वॉलमन द्या.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :-** ठेकेदाराचे एकही टॅकर आला नाही. तो जर टँकर पुरवठा करीत नसेल तर ठेका का चालू ठेवता.

**श्री.काकडे ज्यु.इंजि. पा.पु. :-** सन १९७२ पासुन शहराला मुळाडॅम वरुन पाणी पुरवठा करण्यांत येतो त्यावेळेस सुरुवातीच्या योजने मधुन शहराला ३५ एमएलडी पाणी पुरवठा करण्यांत येत होता. तद्नंतर सन १९९५ साली सुधारीत पाणी पुरवठा योजना राबवुन त्यात वाढ होवून ७३ एमएलडी पाणी पुरवठा करण्यांत आला गेले दोन वर्षापासुन फेज-२ योजनेमधुन मुळानगर, विळद, नागापुर येथे पंप हाउस मध्ये नव्याने पंप बसवुन पाण्यात वाढ करुन ८८ एमएलडी पाणी पुरवठा करण्यांत येत आहे. परंतु आजमितीस शहरास १०० एमएलडी पाण्याची आवश्यकता आहे. तरी देखील आपण आहे त्या साठयात पाणीपुरवठा करीत असुन शहराला एक दिवसा आड व उपनगरास ४-५ दिवसा आड पाणी पुरवठा करण्यांत येत आहे. सन २००८ ला जो साठा आहे त्यानंतर कुठेही लाईनवर कनेक्शन देवू नये व लाईन टाकू नये हा तांत्रिक डाटा असुन देखील आज पर्यंत नव्याने लाईन टाकण्यांत आल्या आहेत. व कनेक्शन देण्यांत आले आहेत. त्यामुळे वितरण व्यवस्था कोलमडली आहे.

**मा.श्री.विनीत पाऊलबुधे :-** फुलफिल रिक्वायरमेंट साठी तुम्ही काय केले.

**श्री.काकडे ज्यु.इंजि. पा.पु. :-** अमृत योजनेतुन १०० एमएलडी पाणी मिळेल. मध्यंतरी शेतक-यांनी ७ महिने काम थांबविले होते. मा.जिल्हाधिकारी साहेब यांनी बाधीत शेतकरी, सर्कल, मंडल अधिकारी, सरपंच, तलाठी यांची संयुक्त मिटींग घेवून मार्ग काढण्यांत आला आहे.

**मा.श्री.आसिफ सुलतान :-** वितरण व्यवस्थेतील दोष दुर करावा.

**श्री.काकडे ज्यु.इंजि. पा.पु. :-** कर्मचारी कमी आहेत ते मिळण्यासाठी पाठपुरावा चालू आहे. कल्याण रोड परिसरात पाहणी केली आहे. उपलब्ध सिस्टीम मध्ये पाणी देत आहोत.

**मा.श्री.शाम नळकांडे :-** कल्याण रोडसाठी निवेदन दिले की तिस-या दिवशी पाणी येते.

**श्री.काकडे ज्यु.इंजि. पा.पु. :-** शट डाउनच्या दिवशी शहरास पाणी पुरवठा न करता, उपनगरात पाणी पुरवठा करतो.

**मा.श्री.सचिन शिंदे :-** १३ दिवसांनी पाणी पुरवठा होतो.

**श्री.काकडे ज्यु.इंजि. पा.पु. :-** सिस्टीम व्यवस्थित झाल्यास कल्याण रोडला ६-७ दिवसांनी पाणीपुरवठा करु. वीज पुरवठा खंडीत झाला तर २-३ तास पाणी पुरवठा खंडीत होतो. लेव्हल मिळत नाही.

**मा.श्री.सचिन शिंदे :-** तुम्हाला जर पाणी पुरवठा करता येत नसेल तर ७५०/- रुपयांनी पाणी पट्टी कमी करण्यांत यावी.

**श्री.काकडे ज्यु.इंजि. पा.पु. :-** दिपाली ट्रान्सपोर्टला काळया यादीत का टाकू नये अशी नोटीस दिली.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** फेज-२ ने शेवटची टाकी रिझर्व्ह होणार होती. त्यातून पाणी देणार होते त्याचे काय झाले.

**श्री.काकडे ज्यु.इंजि. पा.पु. :-** ट्रायल घेतली. वसंत टेकडीला लेव्हल असेल तर पाणी टाकीत येते. बायपास वरुन पाणी चालू आहे.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** ८८ एमएलडी पाणी कशाला म्हणतात. नियोजन सुरळीत करा. लिकेज काढा, वॉलमन व फिटरची बैठक घेवून ठोस निर्णय घ्या.

**मा.श्री.गणेश कवडे :-** सर्व नगर शहराला एक टीएमसी पाणी लागते. विळदची कॅपॅसिटी ही २ टीएमसी आहे.

**मा.श्री.विनीत पाअुलबुधे :-** फेज-२ कधी सुरु झाली.

**श्री.काकडे ज्यु.इंजि. पा.पु. :-** सुरुवातीचे फेज-२ योजनेत आजची अमृत योजना समाविष्ठ होती परंतु तत्कालीन शासनाने त्यात काटछाट करुन फेज-२ मध्ये वितरण व्यवस्था, पंपींग मशिनरी व टाक्या धरण्यांत आल्या असुन आज मितीस होणारी अमृत योजना मुळ फेज-२ योजनेतुन रद्द करण्यांत आली. तद्नंतर शासनाने अमृत योजनेला मान्यता दिली. त्या अमृत योजनेचे काम चालू आहे. नागापूर, भिस्तबाग, निर्मलनगर, एस.आर. मधुन पाणी देता येईल त्याची ट्रायल घेतली आहे. उद्याच्या स्थायी समितीमध्ये फेज-२ पाईप लाईन वरुन कनेक्शन जोडणे बाबत टेंडरचा विषय घेतला आहे. उद्या त्यावर निर्णय होवून तो प्रश्न मार्गी लागेल.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :-** ढवण वस्तीसाठी नविन पाईप लाईन टाकणेची तरतुद करा.

**मा.श्री.योगीराज गाडे :-** फेज-२ केंव्हा पूर्ण होणार.

**श्री.काकडे ज्यु.इंजि. पा.पु. :-** फेज-२ नागापूर, निर्मलनगर, भिस्तबाग या एरियाला पाणी देता येईल. काम सुरु झाल्यानंतर ३ महिने लागतील.

**मा.श्रीमती.कोतकर :-** केडगांव भागात काही भागात प्रेशरने पाणी येते काही ठिकाणी वाया जाते.

**श्री.काकडे ज्यु.इंजि. पा.पु. :-** केडगांवचा पाण्याचा प्रश्न ब-या पैकी मार्गी लागला आहे.

**मा.श्री.मनोज कोतकर :-** साईनगर भागात लाईन नाही.

**मा.महापौर साो :-** लवकर व्यवस्था करा.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** कनेक्शन बदली फी २००/- भरुन का जोडून देत नाही.

**श्री.काकडे ज्यु.इंजि. पा.पु. :-** एचडीपीई ची लाईन आहे. जनरल कनेक्शन नाही.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** एका कनेक्शन जोडणी साठी किती खर्च येणार आहे.

**श्री.काकडे ज्यु.इंजि. पा.पु. :-** ३१०८/- रुपये रोड क्रॉसिंग साठी, २२००/- रुपये विधाउट रोड क्रॉसिंगसाठी दर ठरला आहे.

**मा.श्री.सागर बोरुडे :-** ३१००/- रु. चार्ज जोडणीसाठी घेण्यांत येणार आहे. बोल्हेगांव, नागापूर ढवणवस्ती येथील नागरिकांची ऐपत नाही. कामगार वर्ग आहे. पालिकेने काहीतरी भार घ्यावा. काही भागात आम्ही स्वतः पदर पैशाने लाईन टाकल्या, कनेक्शन दिले. काही ५०% भार पालिकेने उचलावा. पाणी दररोज देत नाही. ६ महिनेच पाणी महानगरपालिका देते. व वर्षभराची पाणीपट्टी आकारते.

**श्री.काकडे ज्यु.इंजि. पा.पु. :-** भविष्यात प्रॉब्लेम येणार नाही.

**मा.महापौर साहेब :-** निर्णय घ्यायचा तर सर्व शहरासाठी घ्यावा लागेल. एका भागासाठी घेता येणार नाही,

**श्री.काकडे ज्यु.इंजि. पा.पु. :-** केडगांव मध्ये ७७०० कनेक्शन याच दराने दिले आहेत. एकाच प्रकारचे पाईप वापरणार आहोत.

**मा.श्री.सागर बोरुडे :-** आमच्या प्रभागात नव्याने कॉक्रीटचे रोड केले आहेत. फेज-२ लाईनवर कनेक्शन देण्यासाठी रस्ता खोदल्या नंतर तो दुरुस्तीसाठी काही तरतुद केली का.

**श्री.काकडे ज्यु.इंजि. पा.पु. :-** नविन तरतुद करावी लागेल. रोड क्रॉसींगसाठी तरतुद करावी लागेल.

**मा.महापौर सो :-** रस्त्याची पॅचिंगची दुरुस्त करण्यासाठी बजेट मध्ये दुरुस्तीची तरतुद करण्यांत यावी.

**मा.श्री.आसिफ सुलतान :-** मुकुंदनगर टाकीतुन पाणी केंव्हा देणार.

**श्री.काकडे ज्यु.इंजि. पा.पु. :-** ७-८ वेळेस टेंडरला मुदत वाढ दिली नविन टेंडर काढले आहे. नविन कनेक्शन देण्यासाठी टेंडर मंजूरी नंतर कार्यवाही करण्यांत येईल.

**मा.श्री.गणेश भोसले :-** महानगरपालिकेकडे किती फिटर आहेत.

**श्री.काकडे ज्यु.इंजि. पा.पु. :-** ३ फिटर आहेत.

**मा.श्री.गणेश भोसले :-** विजयनगर मध्ये ८ दिवसापासुन ड्रेनेजचे पाणी येते लोकांच्या आरोग्याशी आपण खेळतो. फिटर मदतनीस बिगारी वॉर्ड निहाय घ्यावेत.८ ते १० बिगारी लागतील. बिगारी नसल्यामुळे काम होत नाही. लोकांना घाण पाणी प्यावे लागत आहे. ही बाब गाभीर्याने घ्या.

**श्री.काकडे ज्यु.इंजि. पा.पु. :-** कामगार मिळणेसाठी रिपोर्ट फायनल झाला आहे.

**मा.श्री.गणेश भोसले :-** व्यवस्था झाली नाही तर आम्ही ते पाणी आणू ते तुम्हाला प्यावे लागेल.

**मा.आयुक्त सो :-** आउटसोर्सीगचे टेंडर प्रोसेसमध्ये आहे.

**श्री.काकडे ज्यु.इंजि. पा.पु. :-** ८-१० दिवसात लेबर मिळतील व काम चालू होईल.

**मा.सौ.सुरेखा कदम :-** शासनाकडून १० कोटी निधी मिळाला ३ टप्प्यात २ टेंडर फ्लॅश झाले. आशा टॉकीज चौक ते बेडेकर क्लास समोर ड्रेनेज लाईन टाकली आहे हे काम कधी होणार. रस्ता खराब झाला आहे. ३ टेंडर मध्ये काम २ दिले त्यात हे काम थांबले आहे. १ निविदा मागे आहे.

**शहर अभियंता श्री.सोनटक्के :-** १० कोटी निधी आला होता शासनाने अंतिम मंजूरी देतांना निविदा सार्वजनिक बांधकाम विभागा मार्फत काढणे बाबत कळविल्यानुसार निविदा त्यांचे मार्फत काढण्यात आल्या. शासनाकडुन काम रद्द झाले तर आपल्याला टाकता येत नाही.

**मा.महापौर सो :-** निधी येणार की नाही, येणार याची माहिती घेवून द्या.

**मा.सौ.सुरेखा कदम :-** मला कोणत्याही निधीतुन बेडेकर क्लास समोरील रस्त्याचे मी सुचविलेल्या कामास निधी द्या.

**मा.श्री.शेख मुदस्सर :-** माझे प्रभागातील मुलाचा मृत्यू कूत्रा चावून झाला त्याला मदत केली नाही . महानगरपालिकेने मदत जाहीर केली ती मिळाली नाही. ५-६ महिने झाले.

**मा.आयुक्त सो :-** मदत जी जाहीर केली ती लवकर देवू.

**मा.महापौर सो :-** लवकरात लवकर मदत द्या.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** शहरातील पिसाळलेले कूत्रे मारायचे कुणी. आपल्याकडे ती कमिटी आहे. पिसाळलेल्या कुत्र्याला मारता येते किंवा नाही. ८-१० दिवसापुर्वी पिसाळलेली गाईने ३ वर्षाच्या मुलीला शिंग मारले आहे. महापौर सो यांनी मदत केली पण हा जो प्रकार आहे हा वाढत जाईल. एखादी कमिटी करुन कूत्रे मारण्याचे ठरविले पाहीजे. कर्मचारी ऑफिसमध्ये जागेवर सापडत नाही. ऑफिस मध्ये हालचाल रजिष्टर ठेवले पाहिजे. शासनाचा निधी जर मागे जाणार असेल तर त्यास कोणाला जबाबदार धरणार. या लोकांची जबाबदारी निश्चीत केली पाहीजे. एक फाईल एका टेबलवर किती दिवस राहिली पाहीजे हे निश्चित नाही. या सिस्टीममध्ये बदल केला तर प्रश्न मार्गी लागतील. आपल्या महानगरपालिकेमध्ये छत्रपती शिवाजी महाराज

यांचे पुतळा बसविणे बाबत ठराव झाला परंतु मंजूर झालेल्या ठरावानुसार पुतळा बसविणे बाबत कार्यवाही काय झाली. एक वर्षामध्ये आपल्याकडे किती पुतळा बसविणेच्या परवानग्या आल्या. उड्डाण पुलाचे उभारणी होतांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा बाधीत होईल का व होत असेल तर पर्यायी जागेत पुतळयाची व्यवस्था करता येईल का याबाबत माहिती द्यावी.

**अतिक्रमण विभाग प्रमुख श्री.इथापे :-** शिवाजी महाराज पुतळा ठरावानुसार बांधकाम विभागामार्फत कारवाई सुरु होती. माझेकडे प्रस्ताव आले नंतर महानगरपालिका आर्किटेक्ट यांचेकडे प्रस्ताव दिला पॅनलवरील आर्किटेक्ट यांनी अद्याप तो दिला नाही. पॅनलवरील आर्किटेक्ट बदलून तो प्रस्ताव सादर करण्यांत येईल. मध्यंतरी लोकसभा व महानगरपालिका निवडणूक आचार संहितेमुळे कार्यवाहीस विलंब झाला. आर्किटेक्ट यांना दोन तीन वेळा पत्र दिले आहे.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** परवानगी न मिळाल्यामुळे पुतळे आपण उभारु शकत नाही. पुण्यात एक नविन पुतळा बसविला ते मी पाहिले आहे. प्रसंगानुरुप घडलेल्या प्रकारामुळे ठराव करण्यांत आला. त्याचे गांर्भीर्यही इथे दिसुन येत नाही. मागच्या बोर्डात ठरले समिती गठीत करणेबाबत निर्णय झाला त्यावर काय कार्यवाही केली. अधिकारी आश्वासने का देतात. काही अधिकारी परवानगीचे काम करतील व काही स्ट्रक्चरचे काम करतील असा विषय महासभेत झाला. आम्ही आर्किक्टेक देवू. अजुन त्याचा पहिला कागद रंगला नाही.

**अतिक्रमण विभाग प्रमुख श्री.इथापे :-** एक महिन्याच्या आत खाजगी आर्किटेक्ट यांचेकडून प्रस्ताव तयार करुन घेवू.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** एका टेबलवर ३ दिवस फाईल थांबली नाही पाहिजे. असे अधिकारी यांना सांगा.

**अतिक्रमण विभाग प्रमुख श्री.इथापे :-** सर्व कायदेशीर प्रक्रीया पार पाडून कार्यवाही करण्यात येईल.

**मा.श्री.अविनाश घुले :-** पूर्वी परवानगीसाठी मुंबईला जावे लागत होते. आता जायची गरज नाही. कलेक्टर परवानगी देवू शकतात माहिती घ्या.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** महानगरपालिकेच्या अजून परवानगी घेतल्या नाहीत.

**मा.महापौर साो :-** तीन दिवसात महानगरपालिकेच्या सर्व परवानगीची कार्यवाही करा.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** प्रत्येक पक्षाच्या सदस्यांना घेवून कमिटी नेमा.

**अतिक्रमण विभाग प्रमुख श्री.इथापे :-** डॉ.आंबेडकरांचा पुतळा स्थलांतरीत करणे गरजेचे आहे. पूर्वी सभेत झालेल्या निर्णयानुसार स्टॅण्ड जवळील पशुवैद्यकीय जागेची मागणी शासनाकडे महानगरपालिकेने केली आहे. २००५ सालापासून सुखसागर हॉटेलचे कोर्ट मॅटर चालू आहे.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** सुख सागर हॉटेलच्या जागेत पुतळा उभारता येईल का.

**अतिक्रमण विभाग प्रमुख श्री.इथापे :-** मोजणी झाल्याशिवाय आत्ताच काही सांगता येणार नाही.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** दोन्ही पुतळयांचे काम लवकरात लवकर सुरु करा. डिझाईन फायनल करा. त्यासाठी एखादे बोर्ड बोलवा. राष्ट्रवादीचे सर्व नगरसेवक आर्किटेक्टचा खर्च वैयक्तीक करतील.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** आम्हालाही समाविष्ठ करुन घ्या.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** सर्व नगरसेवकांचा समावेश करा. रोख पैसे जमा करा.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** कॅफो यांची काही हरकत आहे का.

**मा.सौ.सुरेखा कदम :-** यामध्ये परमिशन आवश्यक आहे. चार पुतळयांचे काम आहे. प्रशासनाने यात विशेष लक्ष घालावे. मा.आयुक्त साो यांनी पत्रव्यवहार करुन जिल्हाधिकारी साहेब यांची मिटींग लावा.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** प्रशासनाने प्रस्ताव तयार करावा एस्टीमेटच्या इक्वल रक्कम करा. सर्वात जास्त देण्यास तयार असेल तर ते घ्या. स्ट्राँग एस्टीमेट करा.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** प्रत्येक पक्षाच्या गटनेत्यांनी नाव सुचवावे. अधिकारी यांची निवड करावी.

**मा.महापौर सो :-** प्रत्येक गटनेत्याने एक सदस्यांचे नाव सुचवावे. अधिका-यांशी सल्ला मसलत करुन काम लवकर पूर्ण करावे.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** राष्ट्रवादीचे वतीने कुमार वाकळे यांचे नांव सुचवले.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :-** डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळया संदर्भात मा.आमदार संग्राम जगताप यांनी इम्पीरियल चौकातील जागे बाबत पत्र व्यवहार केला आहे.

**मा.श्री.आसिफ सुलतान :-** आयुक्त सो यांचेकडील बैठकीतील इतिवृत्तात कूत्रे मारण्याची परवानगीचे आदेश देण्यात येतील असे आदेश आहेत. त्यावर काय कार्यवाही केली.

**आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :-** दोन व्हेटर्नरी डॉक्टरांना तसे आदेश दिले आहेत.

**मा.महापौर सो :-** कुत्रे पकडणे चालू आहे का बंद आहे.

**आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :-** पिंपळगांव माळवी येथील ग्रामस्थांनी कुत्रे सोडण्यास विरोध केला आहे. यंत्रणा चालू आहे.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :-** यंत्रणा बंद आहे.

**आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :-** संस्थेला काम दिले आहे. पिंपळगांव माळवी येथील प्रकल्पा शेजारील श्री. झीने यांच्याकडून युनिटसाठी पाणी घ्यायचो तिथे एक्सस्टेंन्शन करतो आहे. एक्सस्टेंन्शच्या वेळी तेथील सरपंचांनी विरोध केला श्री.झीने यांनी पाणी देण्यास विरोध केला. उद्या तेथे बोअर घेणार आहोत. परवा पासून सर्व यंत्रणा पूर्ण क्षमतेने चालू होणार.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :-** यंत्रणा पूर्ण क्षमतेने चालू झाली पाहिजे.

**आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :-** दोन दिवसात काम चालू होईल.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :-** डॉ.शेळके यांचे बील दिले नाही तर तो काम चालू करणार नाही असे ते म्हणतात खोटे कारणे सांगू नका. ७२ लाख पेंमेट थकले आहे. काम न करता कशासाठी एवढी बीले द्यायची.

**मा.महापौर सो :-** नागरिकांना रात्रीचे फिरणे मुश्कील झाले आहे यावर ठोस कारवाई करा.

**आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :-** मोकाट कुत्रे व मोकाट जनावरांचे संदर्भात मा.आयुक्त सो यांचे कडेस बैठक झाली. त्यांनी दिलेल्या सूचनेनुसार कार्यवाही चालू आहे.

**मा.महापौर सो :-** ठोस कारवाई काय करणार ते सांगा

**आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :-** डीपीडीसी मधून निधी उपलब्धते बाबतची प्रक्रिया झाली आहे. ८-१५ दिवसात ४००-५०० कुत्र्यांची व्यवस्था लावता येईल.

**मा.श्री.अमोल येवले :-** वॉर्ड क्रमांक १० दलित वॉर्ड आहे. १० कोटी निधी आला तो कोठे गेला. रामवाडी लालटाकी कोठला झोपडपट्टी इथे भरपूर कामे करावयाची आहेत.

**मा.महापौर सो :-** ४ कोटी राहिलेला निधी देण्यात येईल.

**मा.श्री.शेख मुदस्सर :-** ज्या ठिकाणी दलित वस्ती आहे त्याठिकाणी निधी टाकावा किती व कोणत्या वॉर्डात निधी वाटणार. दलितवस्ती साठीच निधी वापरण्यात यावा. इतर ठिकाणी विशेष निधीची मागणी करण्यांत यावी.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :-** कुत्रे पकडणे साठी फोन केला असता संबंधित अधिकारी १० मिनीटात गाडी येईल असे सांगतात पण गाडी येत नाही.

**श्री.म्हसे :-** संस्थेच्या कर्मचा-यांना फोन केला इमर्जन्सी सेवा असल्याने सांगीतले तो पाठवतो म्हणाला विधाटे म्हणून नागरिकांना भेटलो.

**मा.सौ.शिला चव्हाण :-** आमच्या वॉर्डात एक कूत्रा धरायला माणूस पाठवला नाही. एक महिला सिरीयस झाली आहे.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :-** मा.आयुक्त साहेब गांभीर्याने घ्या मुले बाहेर खेळतात.

**मा.महापौर सो :-** या पुढे घटना घडली तर म्हसेंना जबाबदार धरु व बडतर्फीची कारवाई करण्यांत येईल.

**मा.आयुक्त सो :-** नवी मुंबई मध्ये एक संस्था काम करते आहे. त्या संस्थेशी बोलणे झाले पिंपळगांव माळवी येथील जागेत या संस्थेला काम देवू. पिसाळलेल्या कुत्र्यांना मारण्या बाबत तरतुद आहे त्यानुसार कारवाई करण्यांत येईल.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** सभेत झालेल्या चर्चेनुसार छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारणे कामी परवानगीचे सोपस्कार पार पाडणेकामी गटनेते यांनी सुचविलेनुसार सर्व पक्षीय सदस्य पुढील प्रमाणे राष्ट्रवादीचे कुमार वाकळे, शिवसेनेकडून श्री.अनिल शिंदे, समाजवादी पक्ष श्री.सुलतान असिफ, बसपा श्री.अक्षय उनवणे, स्वप्नील शिंदे, कॉंग्रेस- सौ.शीला चव्हाण सर्व नगरसेवकांना इथापे सो मदत करतील.

**डॉ.श्री.सागर बोरुडे :-** दोन वर्षात किती कूत्रे निर्बिजीकरण केले.

**श्री.म्हसे :-** ४०२७ निर्बिजीकरण केले. ७२ लाख बील आहे. ४८ हजार बिल अदा केले.

**डॉ.श्री.सागर बोरुडे :-** कुत्र्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत चाललेली आहे. आहे ती संख्या सुध्दा कमी झालेली नाही. समस्या किती भयानक आहे. मोकाट जनावरां संबंधी आपण काय ठोस निर्णय घेणार आहात.

**मा.आयुक्त सो :-** मोकाट कुत्रे, पिसाळलेल्या कुत्रे मारण्यासाठी समितीने परवानगी दिली आहे.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** ज्या वॉर्डातील कूत्रे उचलले त्या वॉर्डाचे नगरसेवकांचे पत्र घ्या. नगरसेवकाचे पत्र असल्याशिवाय बील अदा करु नका

**मा.सौ.रुपाली वारे :-** आमच्या प्रभागात ७-८ महिने झाले वायरमन नाही. स्ट्रीट लाईट बंद आहेत.

**मा.महापौर सो :-** आत्ताच्या बजेटमध्ये २ कोटी वाढवुन घेवू. नगर शहरा मध्ये कचरा, रस्ते, पाणी हे प्रश्न आहेत. लाईट साठी मानधनावरील कर्मचारी वाढवून घेवू मानधनही वाढवू व त्यासाठी २ कोटी तरतुद वाढवू.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** आपण जर हेडवाईज गेलो तर सर्व विषय मार्गी लागतील.

**मा.महापौर सो :-** अंदाजपत्रक वाचन करु.

**मुख्यलेखाधिकारी :-** पान नंबर ३४, महानगरपालिका कर व दर ठळक मुद्दे वाचन केले. सर्वसाधारण कर, वृक्ष कर, रस्ता कर, जाहीरात कर

**मा.महापौर सो :-** जाहीरात कर दुप्पट करा.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :-** सर्व साधारण कर किती वसुल झाला. वसुली २६ कोटी झाली, तरतुद ३७ कोटी अपेक्षित धरली यातुन किती वसुली अपेक्षित आहे. वसुली निम्म्यापेक्षा कमी होते. यासाठी काय नियोजन आहे. शास्ती माफी करावी. वेगवेगळया योजना राबवाव्यात. नागरिकांकडून जास्तीत जास्त कर वसुलीसाठी प्रशासन काय कार्यवाही करणार यांची माहिती घ्या. ज्या प्रमाणात कर आपण गोळा करतो त्या प्रमाणात सुविधा आपण देवू शकत नाही. ज्या प्रमाणात कर घेवू त्या प्रमाणात सुविधा देता येतील.

**मा.श्री.विनीत पाउलबुधे :-** तफावत कशी दूर करणार. वन टाईम सेटलमेंट करता येईल का. न्यायालयाकडून काही पत्र आले आहे का.

**श्री.झिने प्र.स.मु.नि.कर संकलन अधिकारी :-** मालमत्ता कर वसुलीसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार लिलावाच्या प्रोसेस राबवणार आहोत. न्यायाधीश यांनी सूचना केली यादी द्या. आम्ही आयुक्त यांचेशी चर्चा करुन तडजोड करु यास एक महिना झाला.

**मा.महापौर साो :-** एक महिन्यात कारवाई का नाही केली.

**श्री.झिने प्र.स.मु.नि.कर संकलन अधिकारी :-** मा.न्यायाधिश यांची मध्यंतरी भेट झाली नाही. विधी सेवा न्यायाधिश यांची तारीख घ्यायची आहे.

**मा.श्री.अविनाश घुले :-** मोठया थकबाकीदारांवर काय कारवाई करणार.

**मा.महापौर साो :-** लवकर यादी न्यायाधिश यांना द्या.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** मागच्या आर्थिक वर्षात घरपट्टी व पाणीपट्टी किती वसुली झाली.

**श्री.झिने प्र.स.मु.नि.कर संकलन अधिकारी :-** सन २०१८-२०१९ मध्ये सर्वसाधारण कर २४.१३ कोटी वसुल झाला. ६१.१८ लाख मागणी आहे. पाणी पट्टी ३०.०० कोटी मागणी आहे.

**मा.श्री.गणेश भोसले :-** किती मालमत्ता बिगर आकारणीच्या आहेत.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** ३७ कोटी वसुल केले. उर्वरीत वसुली का केली नाही. तुम्ही वसुली करता तर काय. नगरसेवकाला रोषाला सामोरे जायचे कारण नाही. महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे हक्काचे स्त्रोत आहे. महानगरपालिकेचा श्वास तुम्ही रोखुन ठेवला आहे. ६० कोटी वसुल का केली नाही.

**मा.महापौर साो :-** या वर्षी किती मागणी

**श्री.झिने प्र.स.मु.नि.कर संकलन अधिकारी:-** ५५.०० कोटी मागणी आहे.

**मा.महापौर साो :-** कमी कशी झाली.

**श्री.झिने प्र.स.मु.नि.कर संकलन अधिकारी :-** वसुली झाल्यामुळे कमी मागणी झाली.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** मागच्या थकीत बाकी संदर्भात तुम्ही काय केले.

**श्री.झिने प्र.स.मु.नि.कर संकलन अधिकारी :-** सन २०१९-२०२० मध्ये ३७.३८ कोटी थकीत कर आहे. १८.५४ चालू वर्षीची मागणी आहे.

**मा.महापौर साो :-** मागील वर्षी पेक्षा यावर्षी मागणीत वाढ का झाली नाही.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** दरवर्षी किती घरांना परवानग्या दिल्या जातात. ही गोष्ट अत्यंत गांभीर्याने घ्या आम्ही नागरिकांचे कामे करण्यासाठी येथे आलो आहोत. जे पैसे खातात त्यांचेवर कारवाई करा.

**मा.महापौर साो :-** कोण पैसे खाते ते सांगा त्यांचेवर कारवाई करु.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** कालपर्यंतची एकुण थकबाकी सांगा.

**श्री.झिने प्र.स.मु.नि.कर संकलन अधिकारी :-** सर्व साधारण कर २२३ कोटी रुपये थकबाकी मागणी आहे. २० कोटी वसुल झाले आहेत.

**मा.आयुक्त साो :-** काही प्रॉपर्टीच्या बाबतीत प्रत्यक्षात डबल टॅक्स लागला. उपायुक्त कर यांचे स्तरावर समिती नेमली असुन त्यामध्ये ज्या प्रॉपर्टीच्या अशा तक्रारी असतात त्याबाबत समितीमध्ये निर्णय घेवून आकारणी करण्यांत येत आहे. सन २०१३ ला महानगरपालिकेची असेसमेंट झालेली आहे. सध्या नेमलेल्या संस्थेच्या कामाचा अहवाल घेतला १.२५ लाख प्रॉपर्टीवर आकारणीत वाढ व्हायला पाहीजे. संस्थेचे काम समाधानकारक नाही. जुलै - ऑगष्ट मध्ये महानगरपालिका कर्मचा-यांकडून आकारणी करुन घेण्यात येईल. दोन तीन महिन्यात आपल्या कर्मचा-यांकडून आकारणी करुन घेणार आहोत. संस्थेने बीलाची मागणी केली आहे. संस्थेचे काम अतिशय थंड आहे. ते काम बंद करतो आहोत.

**मा.श्री.गणेश भोसले :-** आपलेच लोक पैसे घेवून काम करत असतील तर त्याची चौकशी करा.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** आपली महानगरपालिका सक्षम आहे. ५१ कोटीच्या ठेवी आहेत. आपल्या महानगरपालिकेची बदनामी होत आहे.

**मा.महापौर सो :-** भिडे चौकात शुभ मंगल कार्यालयास चुकीची घरपट्टी लावली आहे. सेटलमेंट करुन आकरणी कमी केली जाईल.

**मा.महापौर सो :-** प्रलंबीत प्रश्न आहेत ते प्रकरणे निकाली काढा.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** टाईम द्या एवढया वेळेत वसुली झाली पाहीजे. जे नागरीक टॅक्स भरतात त्यांच्यावर अन्याय होतो. शास्ती माफीचा चुकीचा पायंडा आहे. संस्थेचे हित जपा संस्था टिकली पाहीजे शास्ती माफीस माझा विरोध आहे.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :-** शास्ती माफी करुन १०० कोटी वसुल होत असेल तर माफी द्यायला काय हरकत आहे.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** सर्व सामान्य नागरिक वेळेवर कर भरतात १०% सुट साठी रांगा लावतात. रेग्युलर त्यांनी पैसे भरले त्यांचेवर अन्याय आहे. शासनाचा निधी मिळणारच आहे.

**मा.महापौर सो :-** वसुलीत काम चुकारपणा करेल त्याच्यावर कारवाई केली जाईल. त्याला निलंबित करु.

**मा.श्री.रविंद्र बारस्कर :-** काही सर्व सामान्य नागरिक हस्तांतरण करु इच्छितात खरेदीच्या १% हस्तांतरण फी भरुन घेतो परंतु या प्रक्रियेस विलंब लागतो. ६ महिने विलंब होतो. ७/१२ उतारा लागतो. प्लॉट एरिया पडताळणी झाल्याशिवाय नाव लागत नाही अशा परिस्थितीत प्रकरण पडून राहते. त्यामुळे महानगरपालिकेची १% हस्तांतरण फी वसुल होत नाही. प्लॅाटवर बांधकाम होवून कित्येक वर्ष झाले परंतु महानगरपालिकेकडून अजुनही त्यांना ओपन प्लॉटची पट्टी आकारणी केली जाते.

**श्री.झिने प्र.स.मु.नि.कर संकलन अधिकारी :-** अशी प्रकरणे आढळली तर संबंधीत कर्मचा-यावर कारवाई करण्यात येईल. ७/१२ मालकी हक्काचा उतारा पक्का मिळाला नाही तर त्याची जबाबदारी आपणांवर निश्चीत होते.

**मा.श्री.रविंद्र बारस्कर :-** इंडेक्स नक्कल व खरेदी खतावर नोंद लावण्यांत यावी.

**श्री.झिने प्र.स.मु.नि.कर संकलन अधिकारी :-** ७/१२ व खरेदी खताचे झेरॉक्स प्रतिवर नाव लावतो.

**मा.श्री.रविंद्र बारस्कर :-** ७/१२ ला नाव लावायला अडचणी येतात.

**श्री.झिने प्र.स.मु.नि.कर संकलन अधिकारी :-** ७/१२ महत्वाचा आहे. इंडेक्स वर दुसरी खरेदी होवू शकते. मा.न्यायालयात अशी प्रकरणे दाखल होतात.

**मा.श्री.रविंद्र बारस्कर :-** भोगवटादार म्हणून नाव लावू शकतो का नाही. अजुन बरेज जण प्लॉटचीच पट्टी भरतात.

**मा.आयुक्त सो :-** जुलै आणि ऑगष्ट मध्ये सर्व्हे करण्यात येणार आहे. आता शास्ती माफी करता येणार नाही. कडक वसुली करण्यांत येईल. शासनाची परवागनी लागेल. शासनाने परवानगी दिली तर कारवाई करता येईल.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :-** सहानूभुतीपूर्वक विचार करुन शास्ती माफी द्यावी. मागील शास्ती माफीच्या वेळेस लोकांनी रांगा लावून पैसे भरले आहेत. मा.संग्राम भैय्या महापौर असतांना शास्ती माफी दिली होती त्यास चांगला प्रतिसाद मिळाला आहे. अनेक लोक या निर्णयाची वाट पहात आहेत. सर्व समस्यातुन मार्ग काढण्यासाठी आर्थिक स्थिती मजबूत होण्यासाठी शास्ती माफी योजना राबविण्यात यावी. कोणाचा विरोध असेल तर तो नोंदवून घ्या. यात काही त्रुटी असतील तर त्या दूर कराव्यात.

**मा.आयुक्त साो :-** कायदेशीर अडचण आहे. आता तसा निर्णय घेता येणार नाही.

**मा.महापौर साो :-** ज्यांनी रेग्युलर पैसे भरले त्यांच्यावर अन्याय होईल शास्ती माफी न देता कडक वसुली करण्यांत येईल. दिवाळीत परत काय निर्णय घ्यायचा तो घेवू. दोन वेळेस शास्ती माफी केली पण त्याला प्रतिसाद मिळाला नाही. माहिती घेवून निर्णय घेवू.

**मा.श्री.गणेश भोसले :-** किती मिळकती आहेत, त्यात बिगर आकारणीच्या कितीआहेत.

**मा.आयुक्त साो :-** आपल्या कर्मचा-यांकडून दोन महिन्यात सर्व्हेचे काम करण्यात येईल.

**श्री.झिने प्र.स.मु.नि.कर संकलन अधिकारी :-** बांधकाम परवानगी दिल्यानंतर एक वर्षानंतर पूर्ण केल्यानंतर त्या दिवसापासून आकारणी करण्यांत येते.

**मा.महापौर साो :-** ब-याच लोकांना पट्टीच दिली नाही.

**मा.श्री.गणेश भोसले :-** ज्या मापामध्ये परमीशन घेतली त्या मापावर पट्टी घ्या कंम्प्लीशन होईल तेंव्हा होईल. गेल्या ५ वर्षात ज्यांनी बांधकाम परवानगी घेतली त्यांना पट्टी लावा.

**मा.आयुक्त साो :-** गेल्या ६ वर्षा पासून कंपनीला काम दिले आहे. त्यांनी कामच केले नाही. आपण जे सांगीतले ते तपासून घेवू .

**श्री.झिने प्र.स.मु.नि.कर संकलन अधिकारी :-** काही कर्मचारी कामे करीत नाही. त्यांची नांवे मी आयुक्तांकडे देतो.

**मा.आयुक्त साो :-** २० वर्षे झाले असेसमेंट होवून ५० हजार मिळकतींची नक्कीच वाढ होईल.

**मा.श्री.विनीत पाअुलबुधे :-** ईगल प्राईड कडे किती थकबाकी आहे.

**श्री.झिने प्र.स.मु.नि.कर संकलन अधिकारी :-** २०१७ मध्ये कम्प्लिशन दिले आहे. संपूर्ण गाळयाला आकारणी केली आहे.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** फ्लॅट धारकांचे उता-यावर नाव लावल्या शिवाय आकारणी करीत नाही. १०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर लेखी घेवून हस्तांतरण प्रक्रीया करु शकतो याबाबत माहिती घेण्यात यावी.

**श्री.झिने प्र.स.मु.नि.कर संकलन अधिकारी :-** भोगवटादार म्हणून आकारणी करतो. हस्तांतरण करीत नाही.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** कर्मचारी काम करीत नसेल तर तुम्ही कारवाई करा. वसुलीकडे जास्त लक्ष द्या.

**मा.महापौर साो :-** पुढे चालू करा.

**मा.सौ.शीला चव्हाण :-** महानगरपालिकेच्या कर्मचा-यांचे देणे कसे देणार.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** वृक्ष कर कसा वसुल करतो.

**श्री.झिने प्र.स.मु.नि.कर संकलन अधिकारी :-** महाराष्ट्र झाडांचे जतन अधिनियम १९७५ मधील कलम १८ नुसार तत्कालीन नगरपरिषद असतांना संकलीत करावर १% प्रमाणे आकारणी करु शकतो. सध्या अर्ध्या टक्क्या प्रमाणे वसुली करतो. वृक्ष कराची मागणी १ कोटी असुन वसुल १५ लाख झाला आहे.

**डॉ.श्री.सागर बोरुडे :-** वसुल झालेली रक्कम वृक्षारोपणासाठीच वापरली जाते का.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** आजपर्यंत महानगरपालिकेने किती झाडे लावली किती जगली याची माहिती द्या. वृक्षाची मागणी करण्यात आली अधिका-यांना सांगीतले महानगरपालिकेला शासनाचा आदेश आहे. महानगरपालिकेला २२ हजार वृक्ष लागवडीचा आदेश आहे.

**उद्यान विभाग प्रमुख श्री.लहारे :-** आजच मला उद्यान विभागाचा पदभार दिलेला आहे. आजच विभागाचा आढावा घेतला वन विभागाकडून झाडे येतात.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** शासनाचे वन विभागाकडुन जी झाडे येतात ती छोटी आहेत. ही झाडे टिकत नाही. मोठया उंचीच्या झाडांचे वृक्षारोपण केल्यास त्यांची वाढ लवकर होईल. या झाडांची किंमत साधारण ७००-१००० रुपये आहेत. अशी खाजगी नर्सरीकडून रोपे खरेदी करुन प्रभागात लावावीत. ज्या झाडांचे वय ३ वर्ष पुर्ण असेल अशी झाडे खरेदी करा.

**उद्यान विभाग प्रमुख श्री.लहारे :-** वन विभागाला तशी मागणी करु.

**मा.श्री.मनोज कोतकर :-** १०-१२ फुटाचे झाडे दिली तर टिकतील.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** तुम्ही बजेटमध्ये तरतुद करुन खाजगी नर्सरी वाल्यांकडून मोठे रापे उपलब्ध करुन घ्या.

**मा.आयुक्त सो :-** काही १०००-२००० झाडे घेण्याचा विषय करु. २२ हजार झाडे येणार नाहीत.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** आमच्या वॉर्डातच १००० झाडे आहेत. झाडाची मागणी व झाडे कधी येणार ते सांगा. पोयटा व झाडे किती दिवसात देणार.

**उद्यान विभाग प्रमुख श्री.लहारे :-** १ जुलै ते ३१ सप्टेंबर २०१९ अखेर पर्यंत २२००० झाडे लावण्याचे मा.शासनाने उद्यीष्ट्य निश्चित केले आहे.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** आमच्या प्रभागात शनिवार पासून वृक्षारोपणाचे काम सुरु केले आहे.

**डॉ.श्री.सागर बोरुडे :-** पिंपळगांव तलावातून पोयटा उपलबध करुन घ्या.

**मा.महापौर सो :-** स्टोअर विभागामार्फत सप्लायर्सला पोयटा टाकायला सांगू.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** शनिवारी पोयटा देण्याची व्यवस्था करा.

**मा.आयुक्त सो :-** आता जर झाडे घ्यायचा निर्णय झाला तर सर्व प्रक्रिया करावी.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** रोख निधीतुन शहरासाठी २ हजार झाडासाठी तरतुद करण्यांत यावी.

**मा.महापौर सो :-** तरतुद करण्यांत येईल.

**मा.श्री.गणेश भोसले :-** मी मागील दहा वर्षापासून वृक्ष गणना झालेली नाही. ती करण्याबाबत वारंवार महासभेत चर्चा उपस्थित केली आहे. परंतु अद्याप त्यावर कार्यवाही झालेली नाही. या विषयावर जर कोर्टात कोणी गेले तर अडचणीचे होईल. वृक्षगणना महत्वाचा विषय आहे. झाड तोडतांना महानगरपालिकेची परवानगी घेत नाही. झाडांची संख्या कमी होत आहे. वृक्षारोपण करतांना जंगली झाडे आणतो ते लावायला कोणी तयार होत नाही. सुंदर झाडे खरेदी करा शोभा वाढेल अशी झाडे लावा. शासनाची स्कीम आहे म्हणून कार्यक्रम राबवायचा यात मजा नाही. गार्डन विभागाकडे इंटरेस्ट असणारे कर्मचारी नेमा.

**श्री.म्हसे उद्यान अधिकारी :-** वृक्षगणने साठी निधीची तरतुद वाढवावी लागेल.

**मा.श्री.गणेश भोसले :-** एकेक प्रभाग घ्या जेवढी तरतुद असेल तेवढी झाडे लावा.

**मा.महापौर सो :-** म्हसेंकडे चार्ज देण्यात अर्थ नाही त्यांचेवर ब-याच वेळा निलंबनाची कारवाई झालेली आहे.

**मा.आयुक्त सो :-** वृक्षगणना लवकर सुरु करु एनजीओ वृक्ष प्रेमींची मदत घेवू.

**मा.महापौर सो :-** बजेट महासभेला अधिका-यांनी अभ्यास करुन उत्तरे देणे अपेक्षित आहे. यापुढे अधिका-यांनी महासभेला येतांना अभ्यास करुन येणे.

**मा.सौ.सुरेखा कदम :-** कै.बा.दे.दवाखान्यासाठी बजेट तरतुद करण्यांत यावी मागचा भाग पुर्णपणे पडायला झाला आहे. ठोस कामासाठी निधी वापर करावा. दोन फेज मध्ये काम करायचे आहे. शहराचे दृष्टीने अत्यंत महत्वाचा विषय आहे. पावसाळा लागला तरी पॅचींग अजुन बरेच प्रमाणात शहरात झाले नाही. केंव्हा होणार.

**शहर अभियंता श्री.सोनटक्के :-** रस्ते दुरुस्ती निविदा मंजूर आहे. माणिकनगर, सारसनगर या कामात रस्ते पॅचींग करण्यांत आले. १० कोटीच्या निधीमधून गावातील रस्ते घेतल्यामुळे पॅचींग करता येत नाही. शहरात भुयारी गटार साठी खोदाई होणार असल्याने पॅचींग केलेले नाही. पावसाळयात पॅचींगचे काम करीत नाही. अमृतचे काम ज्या भागात झाले त्या ठिकाणी पॅचींग करुन घेवू.

**मा.सौ.सुरेखा कदम :-** मदरशहा मस्जीद जवळील काम पूर्ण केंव्हा होणार.

**शहर अभियंता श्री.सोनटक्के :-** प्राधान्याने जर रस्ता सुचविला तर काम करता येईल निधी अद्याप आलेला नाही. ३ कामापैकी २ कामांना वर्क ऑर्डर दिलेली आहे.

**मा.सौ.सुरेखा कदम :-** बाजारपेठेतील रस्त्याचे पॅचीगसाठी निधीची तरतुद करा. माळीवाडयातील कचरा रॅम्प कुठेतरी हलवा तेथे तीन शाळा आहेत. निधी उपलब्धआहे. वर्क ऑर्डर दिलेली आहे. दोन दिवसात जर रॅम्प हलविला नाही तर आम्ही शाळेतील विद्यार्थ्यांसोबत रस्त्यावर आंदोलन करु. किती दिवस मुलांचे जीवाशी खेळणार. कचरा रॅम्प हलवायचा नसेल तर रॅम्प बंद करा.

**शहर अभियंता श्री.सोनटक्के :-** माळीवाडयातील कचरा रॅम्प नालेगाव स.नं.२३० मध्ये हलविण्यासाठी निविदा मागविल्या आहेत.

**मा.सौ.सुरेखा कदम :-** त्या जागेसाठी विरोध होतो शहराबाहेर हलवा.

**शहर अभियंता श्री.सोनटक्के :-** महानगरपालिके कडून पर्यायी जागा उपलब्ध झाल्यावर कार्यवाही करण्यांत येईल.

**मा.महापौर सो :-** चार विभागाला चार रॅम्प ठेवले तर चांगले होईल. कोणावरही अन्याय होणार नाही. कच-याचे प्रमाण कमी होईल. वासही कमी होईल. कच-याची विल्हेवाट लावता येईल. प्रक्रिया व्यवस्थीत झाली तर वास सुध्दा येणार नाही. इतर शहरातही मध्यवर्ती ठिकाणी रॅम्प आहे. चारच्या ऐवजी १० ठिकाणी करा.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :-** पॅचींगचे काम माझे वॉर्डापर्यंत आले तर बंद होते. सावेडी उपनगरात पॅचींग कधी होणार.

**शहर अभियंता श्री.सोनटक्के :-** पॅचींगची यादी द्या.

**शहर अभियंता श्री.सोनटक्के :-** दिपाली बारस्कर यांचेकडून यादी प्राप्त करुन घेणे बाबत पारखी यांना सांगीतले आहे.

**घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख श्री.मेहेत्रे :-** चार प्रभाग समितीमध्ये रॅम्प उभारणी कामी नगररचना विभागाकडून जागेची मागणी करण्यांत येईल. नगररचना विभागाकडे मागणी करतो त्यांचा प्रस्ताव आला की कार्यवाही करण्यात येईल. नविन कॉम्प्यॅक्टर आला की अडचण नाही. रॅम्प लगेच दूर करता येणार नाही. चार झोनमध्ये कॉम्पॅक्टर आले की रॅम्पची आवश्यकता राहणार नाही. वाहनाची ऑर्डर दिल्यानंतर असेब्लींगसाठी दोन महिने लागणार आहेत.

**मा.आयुक्त सो :-** आपण लवकरात लवकर बंद करु.

**मा.सौ.सुरेखा कदम :-** महापौर साहेब आठ दिवसात कचरा रॅम्प बंद करा.

**मा.सौ.शीला चव्हाण :-** महानगरपालिकेला कर्मचारी पतसंस्थेचे ३० लाख, ठेकेदारांचे ३७ कोटी, लाईट बिलांचे १०० कोटी देणे आहे. या देण्यांची तरतुद कशी करणार.

**मुख्यलेखाधिकारी :-** जशी वसुलीची कार्यवाही शिघ्र गतीने होईल देणे भरपूर आहे. ज्या प्रमाणात वसुली होईल त्या प्रमाणात देणे देण्यात येईल.

**मा.सौ.शीला चव्हाण :-** महानगरपालिका हिस्सा १०% रक्कम महानगरपालिकेने तरतुद केली आहे काय.

**मुख्यलेखाधिकारी :-** महानगरपालिकेकडून संबंधीत योजनेची तरतुद केली आहे.

**मा.सौ.शीला चव्हाण :-** रक्तपेढी विभागामध्ये जी मशिनरी आहे ती चालू आहे का.

**मा.महापौर सो :-** चालू आहे.

**मा.सौ.शीला चव्हाण :-** अमरधाममध्ये दोन ओटयावरील शेड गळते आहे.

**शहर अभियंता श्री.सोनटक्के :-** अमरधाम साठी ४६ लाखाच्या निविदा मागविल्या आहेत. लवकरात लवकर काम सुरु होणार आहे.

**मा.सौ.शीला चव्हाण :-** कर्मचा-यांना रेनकोट गमबुट देण्यात यावा. १ कोटी पर्यंत वैद्यकीय बिला साठी बजेटमध्ये तरतुद करावी.

**मा.सौ.पुष्पा बोरुडे :-** सभागृहाची पायरी व्यवस्थीत करायला सांगा.

**मा.महापौर सो :-** पायरी व्यवस्थीत करा.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :-** सभागृहाचे काम करणे बाकी आहे ते करण्यांत यावे.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक निधी बाबत माहिती द्या.

**श्री.जोशी नगररचना विभाग :-** एफ.एस.आय देतो. त्याची तरतुद आहे. मागील वर्षी २ कोटीची तरतुद केली आहे. यावर्षी ५० कोटी तरतुद केली. विभागाने २.५० कोटींची तरतुद प्रस्तावित केली. स्थायी समितीने ३.५० कोटी केली.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** यातुन काय काम करु शकतो.

**श्री.जोशी नगररचना विभाग :-** संबंधित भागात रस्ते, लाईट पाणी व्यवस्था करु शकतो. महानगरपालिका क्षेत्रात कुठेही करु शकतो.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** पान नंबर ४८ वर सावेडी गांव सिटी सर्व्हे साठी दरवर्षी तरतुद करतो. पण काम होत नाही.

**श्री.जोशी नगररचना विभाग :-** सिटी सर्व्हे झालेला नाही. सन २०१३-२०१४ दरम्यान १७ लाख रक्कमेचा चेक दिला अजून जो भाग शिल्लक आहे. तेवढया रक्कमेचा चेक भरायला भूमी अभिलेखने सांगीतले आहे.

**मा.महापौर सो :-** जेवढया रक्कमेचा चेक दिला तेवढे काम करण्यास सांगा. तरतुद ठेवतांना थोडी जास्त ठेवा. राहिलेला भागही घ्या.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** आपण दरवर्षी तरतुद करतो पण रिझल्ट काहीच नाही. किती कालावधीत कामा होईल तो ठराविक कालावधी सांगा.

**श्री.जोशी नगररचना विभाग :-** फॉलोअप घेण्यात येईल. भुमी अभिलेख विभागाने काम करणे अभिप्रेत आहे.

**मा.महापौर सो :-** या कामी रविंद्र बारस्कर, संपत बारस्कर तुम्ही पाठपुरावा घ्या.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** विद्युत साहित्याचे ठेकेदाराचे बील वेळेवर देत नाही त्यामुळे मटेरियल मिळत नाही यात सुधारणा केंव्हा होणार.

**श्री.बल्लाळ विद्युत विभाग प्रमुख :-** इलेक्ट्रीक विभागास साहित्य खरेदीत अडचण नाही. मागील वर्षी विद्युत विभागाकडील विद्युत साहित्य खरेदी तरतुदीमधुन दुस-या कारणासाठी वापर करण्यांत आला. म्हणुन अडचणी आल्या. पुर्वी सदस्य येवून मटेरियल घेवून जायचे आता वायरमनकडे साहित्य देवून बसविण्यांत येते.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** वायरमनलाच मटेरियल देत नाहीत.

**श्री.बल्लाळ विद्युत विभाग प्रमुख :-** इलेक्ट्रीक विभागाला इलेक्ट्रीक इंजिनियर नाही. मानधनावरील १२ वायरमन संपावर आहेत. बिगारी, वायरमन कमी आहेत. आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध नाही. निधी उपलब्ध नाही. ऐकेक अडचणी दूर करीत आहोत. वायरमनच्या ४८ जागा स्टॅपिंग पॅटर्न मध्ये मंजूर आहेत. संपूर्ण शहरासाठी १० वायरमन काम करतात.

**मा.महापौर सो :-** आणखी १० वायरमन आउट सोर्सींग मार्फत मागणी करा.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** त्यांचे मानधनही वाढविण्यांत यावे.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :-** प्रत्येक वॉर्डातील स्वतंत्र वायरमन द्या त्याला मदतनीस द्या.

**श्री.बल्लाळ विद्युत विभाग प्रमुख :-** पूर्वी हायड्रॉलीक एकच गाडी होती आता दोन गाडया आहेत. आता बरेच मटेरियल उपलब्ध आहे परंतू १४ तारखेपासून वायरमन संपावर असल्याने काम पूर्ण क्षमतेने होत नाही.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** कायमस्वरुपी ८ वायरमन आहेत. मानधनावरील २ वायरमन गेले आहेत त्यांना पुन्हा घ्यावे असे मत आहे.

**मा.महापौर सो :-** १२ आणि आजुन १० घ्या.

**श्री.बल्लाळ विद्युत विभाग प्रमुख :-** मालेगांव महानगरपालिकेने देखभाल दुरुस्तीचे टेंडर मागविले आहे. २ कोटीची तरतुद या बजेटमध्ये करावी.

**मा.श्री.शेख मुदस्सर :-** या दोन वायरमनला घ्या.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :-** एका प्रभागासाठी २ बिगारी २ वायरमन असले की काम सुरळीत होईल त्या गोष्टीसाठी ३ कोटींची तरतुद करण्यांत यावी. प्रत्येक प्रभागाची व्याप्ती पाहून कर्मचारी उपलब्ध करुन घ्या.

**मा.श्री.शेख मुदस्सर :-** जुन्या ठिकाणी आहे. त्या च ठिकाणी त्यांना घ्या उद्या आम्ही टेंडरला मंजूरी देतो.

**श्री.बल्लाळ विद्युत विभाग प्रमुख :-** माझी सभागृहाला विनंती त्या क्षेत्रातील इंजिनियरची नेमणूक करण्यांत यावी. मला इलेक्ट्रीकचे ज्ञान नाही. प्रशासकीय दृष्टीने मी काम बघत आहे.

**मा.महापौर सो :-** मानधनावर इलेक्ट्रीक इंजिनियर घ्या.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** बल्लाळ ऐवजी दुस-या व्यक्तीची नेमणूक करा.

**मा.श्री.गणेश भोसले :-** बल्लाळ सद्या करीत नाहीत. ठेकेदार यांनी पत्र दिले त्यांची बीले थकल्यामुळे ते लाईट काढुन घेणार आहेत.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** ठेकेदार मटेरियल काढून घेणार असे पत्र दिले बल्लाळ यांनी सभागृहाला अवगत केले. ब्लड बँकेचे चुकीचे उत्तर दिले एकपण टेक्नीकल अधिकारी नाही. ब्लड बँक बंद आहे. महिला नगरसेविकेला चुकीचे उत्तरे देतात दिशाभुल करणारी उत्तरे देतात.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** रस्ते खोदाई पोटी जे शुल्क वसुल करतो त्या बाबत माहिती घ्या. तुम्ही ज्या वॉर्डात खोदाई केली त्या वॉर्डात काम करता का. इतर प्रभागात करता कोणत्या कंपनीने पैसे भरले.

**शहर अभियंता श्री.सोनटक्के :-** रिलायन्स, जीओ,०८/१२/२०१७ ला ७४ लाख रुपये भरले. रस्ते खोदाई साठी दर फूट १५०० रु रनिंग मीटर आहे.

**मा.महापौर सो :-** याची मोजणी कोण करतात.

**शहर अभियंता श्री.सोनटक्के :-** संयुक्त मोजणी करण्यांत येते. आपला इंजिनियर व त्यांचा प्रतिनिधी ३१/०५/२०१८ ला २ कोटी ७१ लाख जमा दिनांक ३०/०३/२०१९ ला १ कोटी ८९ लाख जमा. एकुण साधारण ५.५० कोटी जमा झाले आहेत.

**मा.महापौर साो :-** १५०० रेट कसा ठरवला.

**शहर अभियंता श्री.सोनटक्के :-** महासभेने ठरवला शासनाचा रेट ७५० आहे.

**मा.महापौर साो :-** रेट २००० रुपये करा.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** प्रभाग क्रमांक १ साठी रस्ते खोदाईसाठी किती निधी आला.

**ज्यु.इंजि.श्री.पारखे :-** एका वर्षात १.२५ कोटी पर्यंत आलेले आहेत.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** प्रभाग क्रमांक १ मधील किती रस्ते पॅचींग केले.

**ज्यु.इंजि.श्री.पारखे :-** कोणत्याही रस्त्याचे काम केलेले नाही. रस्त्याचे कडेने जी केबल जाते. जी खोदाई होते ती पॅचींग करतो.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** आम्ही काम आडवले तर आम्हाला फोन येतो. आमच्या वॉर्डातील रस्त्याची चाळण करणार का हे पैसे गेले कुठे हे सांगा.

**शहर अभियंता श्री.सोनटक्के :-** ५४ लाखांची निविदा मंजूर आहे. ज्या भागात केबल टाकली जाणार त्या भागातील रस्ते पॅचींगसाठी वेगळी निविदा करतो. उर्वरित निधी महानगरपालिका फंड नाट्य गृहासाठी २ कोटी वर्ग केले पंपींग स्टेशन ते सत्यम हॉटेल रस्ता, महानगरपालिका हिस्सा म्हणुन १ कोटी रुपये वर्ग केले. पॅचींग निविदा ४० लाख वर्ग केले.

**मा.महापौर साो :-** असे निधी वर्ग करता येतात का.

**शहर अभियंता श्री.सोनटक्के :-** रस्ते खोदाईतुन रस्ते करण्या मध्ये वर्ग केले.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** तुम्ही हे पैसे घेता तुम्ही इतर ठिकाणी पैसे वर्ग करता सत्यम हॉटेल जिथे खोदाई झाली नाही तिथे रस्ते पॅचींग केलेच नाही. वॉर्ड क्रमांक १ मध्ये जेथे खोदाई केली त्याचे टेंडर काढले आहे. ज्याच्या वॉर्डात खोदाई झाली तेथेच पॅचिंग करा. ज्या भागातील विकासीत काम करावयाचे असेल तेथेच करा.

**शहर अभियंता श्री.सोनटक्के :-** शासनाचे जसे आदेश आहेत. ५०.५० टक्के करावेत अशा सूचना आहेत. महानगरपालिका फंडातुन कामे कोणी करीत नाही.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** २५ टक्के शहरातील रस्ते खोदाई साठी इतर निधी त्या- त्या प्रभागातील रस्ते पॅचिंग करावेत.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :-** आमचे वॉर्डामध्ये पैसे खर्च झाले नाहीत मग पैसे कुठे गेले या अंतर्गत तरतुद करा.

**मा.महापौर साो :-** दिपालीताई बारस्कर यांनी जे पत्र दिले तो रस्ता घेणेत यावा.

**मा.श्री.गणेश भोसले :-** अमृत ड्रेनेज योजने विषयी बोलतो त्या लोकांनी ४-५ ठिकाणी रस्ता खोदला ड्रेनेज लाईन करतांना त्या ठिकाणी काहीच करीत नाही. रोड का केले नाही. आर्थिक नुकसान कोणाचे त्यांची जबाबदारी असतांना काम करुन घेत नाहीत. हे काम थांबवा.

**पाणीपुरवठा इंजिनियर श्री.काकडे :-** नोटीस पाठविल्या अगोदर हे काम करणे बाबत नोटीसा दिल्या आहेत. अगोदर हे काम पूण्रकरुन घेवू मग लाईन आउट देवू.

**मा.महापौर साो :-** दुसरे रस्ते करण्याआधी हे रस्ते करा मग दुसरे काम करा.

**मा.श्री.गणेश भोसले :-** शहरात कच-याचा प्रश्न गंभीर आहे. कामगार नाहीत. एस.आय.नाही. वाहन नादुरुस्त आहेत. रोज वृत्तपत्रात बातम्या येतात फोटो येतात कच-याकडे लक्ष द्या. माझे प्रभागात झोन कार्यालय आहे. त्याच्या मागील बाजूस शाहू महाराज तालीम आहे. त्या ठिकाणी इंजिनियर यांना पाठवून पाडण्यात यावी. तुमच्या माध्यमातुन लेडीज पार्क साठी तरतुद करा. दिड एकर जागा आहे. बजेटमध्ये तरतुद करा.

**मा.महापौर सो :-** ठीक आहे तरतुद करु.

**मा.श्री.अविनाश घुले :-** ८० सफाई कामगार विषय आहे. प्रत्येक झोनला २० सफाई कामगार आहेत. ८० कामगार घेतले तर कच-याचा प्रश्न सुटू शकेल.

**घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख श्री.मेहेत्रे :-** कंत्राटी लोक पावसाळी गटर साफ करण्यासाठी २० खाजगी ठेकेदारा मार्फत लोक घेत आहोत.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** चव्हाणताई यांनी प्रश्न विचारला रक्त विघटन प्रक्रिया चालू आहे का.

**आरोग्य अधिकारी डॉ.श्री.अनिल बोरगे :-** डॉ.शंकर शेडाळे यांचेकडेस रक्तपेढीचा चार्ज आहे. त्यांचे त्याठिकाणी लक्ष नसते. रक्तपेढी चालू आहे. खूपवेळा सूचना केल्या पण ते पाळत नाहीत.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** शोकांतीका आहे. त्या ठिकाणी अधिकारी नाही. लहारे साहेब यांनी प्रस्ताव सादर केला. आरोग्याधिकारी म्हणून तुम्ही काम करीत आहे. रक्त संकलन झाले पाहिजे प्लेटलेट प्लाझमाची गरज नागरिकांना भासते. चुकीचे उत्तरे देवू नका.

**वैद्यकीय आरोग्यअधिकारी डॉ.बोरगे :-** अन्न औषध प्रशासन नियमावलीनुसार देय लायसन आहे. मा.आमदार संग्रामभैय्या जगताप यांनी डीपीडीसी मधून निधी प्राप्त करुन दिला.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** माझी पत्नी महापौर असतांना रक्त पेढीचा परवाना रद्द केला असतांना मा.आरोग्यमंत्री यांचेशी संपर्क करुन रक्त पेढी चालू केली. गोरगरीब रुग्णांना सेवा मोफत केलीच पाहिजे. गोरगरीबांसाठी कै.बा.दे.दवाखाना आहे. डॉ.बोरगे अजिबात लक्ष देत नाही.

**वैद्यकीय आरोग्यअधिकारी डॉ.बोरगे :-** आता प्लाझमाच्या १०३ बॅगा शिल्लक आहेत.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** माझेकडे तेथील तक्रारी आल्या आहेत. आयुक्त व महापौर यांनी पाहणी करावी. त्या ठिकाणी काही आवश्यकता भासल्यास निधी द्या. लोखंडी पुलाला अधिकृत तरतुद करण्यांत यावी. उपायुक्त श्री.पठारे यांनी माहिती द्यावी. ते आमच्या भागातील रहिवाशी आहेत.

**शहर अभियंता श्री.सोनटक्के :-** पुलाच्या दोन्ही बाजुला भराव आहे. लाईट पोल शिफ्टींग करणेचे काम बाकी आहे. ठेकेदाराला दैनंदिन १००० रुपये दंड केला आहे.

**मा.महापौर सो :-** १ लाख रुपये दर दिवसाला दंड करा.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** कच-यासाठी कॉम्पॅक्टर व इतर वाहनांची खरेदीची प्रोसेस लवकर पुर्ण करा निधी येत असून प्रोसेसला वेळ लागेल.

**मा.महापौर सो :-** २९ कोटीचे टेंडर कोणामुळे थांबले त्यांच्यावर कारवाई करा.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** गेल्या ८ वर्षापासून संबंधित अधिकारी संकलनाचे टेंडर होवू देत नाहीत. घरकुलाचा चार्ज मेहेत्रे यांचेकडे ठेवा. घरकुलाचे चांगले काम ते करतात. इथापेंकडे चार्ज दिला मेहेत्रेंकडे तो चार्ज द्यावा.

**मा.श्री.गणेश कवडे :-** नगरसेवक निधी तसाच पडून असतो. कॅश करता येईल ते पहा सर्वांना समान द्या.

**मा.श्री.स्वप्नील शिंदे :-** नगरसेवक निधी वाढवावा व कॅश स्वरुपात करावा. मा.शासनाकडून महानगरपालिकेस विविध योजनांमधून निधी प्राप्त होतो. जिल्हा नियोजन कडील निधी जो प्राप्त होणार आहे त्यामधुन कामे सुचविण्याचा अधिकार महापोर यांना देण्यात यावा.

**मा.महापौर सो :-** नगरसेवक निधी दोन्ही मिळून १४ लाख करण्यांत येईल.

**मा.श्री.शेख मुदस्सर :-** नगरसेवक निधी अकौंट कडे गेल्या नंतर त्वरीत अदा करणे बाबत आदेश द्या.

**मा.महापौर साो :-** नगरसेवक वॉर्ड विकास निधी १४ लाख करण्यांत येईल.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** नगरसेवकात भेदभाव करु नका.

**मा.सौ.शीला चव्हाण :-** १ जुलै २०१९ पासून सातवा वेतन लागू केला तो लागू करण्यात यावा.

**मा.सौ.सोनाली चितळे :-** शहरात महिलांसाठी जीम करा.

**मा.महापौर साो :-** या विषयावर चर्चा करु.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :-** माझे प्रभागात पाईपलाईन रोडवर ओपन स्पेस आहे. यशोदानगर जागेत एवढा किंमती ओपन स्पेसवर अतिक्रमण होत आहे. या ओपन स्पेस मध्ये जेष्ठ नागरिकांना विरंगुळा केंद्र विकास भार लेखा शिर्षकातुन ३५ लाख रुपये उपलब्ध करुन द्यावा. कचरा कुंडी आहे.

**मा.महापौर साो :-** ठीक आहे.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :-** पाईपलाईन रोड भाजी मार्केट आहे तेथे शौचालयाची व्यवस्था करावी. तेथे महिला भाजी विक्री करतात.

**मा.सौ.शोभा बोरकर :-** आनंद शाळेजवळ झाड पडायला आले. त्याठिकाणी मुरुम टाकण्यांत यावा.

**मा.महापौर साो :-** श्री.म्हसे यांनी सभा संपल्यानंतर पाहून घ्या.

**मा.श्री.मनोज कोतकर :-** केडगांव शिवारात स्वीमींग पुलची गरज आहे. केडगांव परिसरात महानगरपालिकेचा दवाखाना इंदिरानगर, शास्त्रीनगर मध्ये व्हावा.

**मा.श्री.आसिफ सुलतान :-** अर्थ संकल्पामध्ये पान नंबर ७३ वर २ लाख तरतुद आहे ती तेवढी ठेवावी पान नंबर ७७ भाजी मार्केटसाठी ० तरतुद केली मागील वेळीची तरतुद ठेवावी. स्थायी समितीत अल्प संख्यांक बहुल क्षेत्रासाठी मुकुंदनगर साठी ५० लाख तरतुद केली त्यापेक्षा वाढवण्यात यावी. १ कोटी करण्यांत यावी. कच-यासाठी १ गाडी चालू आहे गाड्या बंद आहेत. केव्हा दुरुस्त होणार.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :-** घनकच-याची वाहने सातत्याने नादुरुस्त होतात. ३० वाहने नादुरुस्त आहेत. त्यापैकी १० वाहनावर आरटीओ यांनी खर्च करु नये असे सांगीतले आहे. दररोज ४-५ गाडया नादुरुस्त होतात. मा.आयुक्त साहेबांशी चर्चा झाली आहे.

**मा.महापौर साो :-** २००-५०० रुपयांच्या दुरुस्तीसाठी वाहने पडून राहतात. प्रस्तावावर सही न करता कोणी अधिकारी जर शहराला वेठीस धरत असेल तर त्यावर बडतर्फीची कारवाई करु.

**मा.उपमहापौर सौ.ढोणे :-** प्रभाग अधिकारी यांना ५० हजाराचा ॲडव्हान्स मंजूर केला आहे.

**मा.श्री.सचिन शिंदे :-** गाडया केंव्हा पासून घेतल्या. गाडी कधी धुतली जाते का. पंक्चर काढायला माणूस नाही. ठेकेदाराकडून ड्रायव्हर घेतो. त्यांनी गाडी ठोकली बॅट-या चोरली तर कोणाकडून वसूल करतो.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :-** संबंधित ठेकेदाराच्या बीलातुन रक्कम वसुली करण्यांत येते.

**मा.सौ.लताताई शेळके :-** प्रभाग क्रमांक १७ मध्ये पार्क नाही. कायनेटीक चौकात उद्यानात कचरा टाकण्यात येतो त्याची व्यवस्था करा.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** १६ ट्रॅक्टर व ४ डंपर भाडे तत्वावर आहेत या २० वाहनांनी जर व्यवस्थीत काम केले ट्रॅक्टरने २ डंपरने २ ट्रीपा केल्या तर शहरात कचरा राहणार नाही. पूर्ण शहरात कचरा जागोजागी आढळतो.

**श्री.मेहेत्रे :-** दोन दिवसात पूर्ण शहरासाठी कचरासंकलनाचा टेंडर फ्लॅश करतो आहे.

**मा.श्री.शाम नळकांडे :-** सिटी बस चालू होणार की नाही.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :-** दिपाली ट्रान्सपोर्टला दिनांक ०६/१२/२०१६ वर्क ऑर्डर दिली बसेसचे रजिस्ट्रेशन व परवाना होवून साधारण ८-१० दिवसात शहर बससेवा चालू होईल. संस्थेचा प्रवासी कर भरला आहे. काही भरण्याची हमी आम्ही दिलेली आहे. रजिस्ट्रेशन परमीट आरटीओ ने करुन दिले तर बस सेवा चालू होईल.

**मा.श्री.गणेश भोसले :-** महानगरपालिकेचे अभियंते भितीच्या छायेत महाराष्ट्र टाईम्स मधील बातमी वाचली. अभियंते जर भितीच्या छायेत असतील तर पालिका चालणार कशी. त्याबाबत निवेदन नेमके कशामुळे पत्र दिले. अभियंते पालिकेचा पाठीचा कणा आहेत.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :-** आम्ही जे निवेदन दिले की ज्या तक्रारी प्राप्त होतात. माहिती अधिकारातील अर्ज येतात त्या अर्जावर थेट कारवाई न करता त्याची संपूर्ण शहानिशा करावी चौकशी करावी मगच कारवाई करावी या अनुषंगाने हे निवेदन दिले.

**मा.श्री.गणेश भोसले :-** तुम्ही एस.पी.ना पत्र दिले. संरक्षणाची मागणी केली नागरिकांचा नगरसेवकांकडे पाहण्याचा दृष्टीकोन वेगळा होतो.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :-** आम्ही जनरल पत्र दिले आहे.

**मा.श्री.गणेश भोसले :-** नगरसेवकांचे जर चुकत असेल तर ते आम्हाला कळवावे. तुमच्या कडून जर चुकीचे काम करुन घेत असतील तर ते सुध्दा कळवा. तुम्ही चुकीचे काम केले असेल म्हणुन तुम्हाला ब्लॅकमेल करीत असेल मा.आयुक्त व महापौर यांनी याकडे गांभीर्याने पहावे.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** बांधकाम परवानगी सुधारणा लेखा शिर्षका अंतर्गत प्रश्न आहे. किती तरतुद केली पान नंबर ७१- ८ अ

**नगररचना विभाग श्री.जोशी :-** रक्कम रुपये १४ लाख तरतुद केली आहे.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** या हेडवर १ ते दीड कोटी रुपये तरतुद करण्यांत यावी. १९९९ पूर्वीचे जे ले-आउट मंजूर आहेत. त्यातील पैसे भरुन घेतले पण सुधारणा त्याठिकाणी ड्रेनेज दुरुस्तीचे एकही काम होत नाही. या अडचणी तात्काळ सोडवण्यात याव्यात. सावेडी कचरा डेपो येथे सुंदर गार्डन व अमरधाम महानगरपालिकेने योजना अंमलात आणावी.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** सावेडी मधील कचरा डेपो हलवा पण त्यावर जो खर्च झाला त्याला जबाबदार अधिका-यांकडून वसूल करा.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** मागच्या अडीच वर्षात खत प्रकल्प कचरा डेपो नेला सावेडी भिस्तबाग चौकापर्यंत या कच-याचा वास येतो. बोल्हेगांव व नागापुरला वास येतो. उपायुक्त दर्जाचे अधिका-याला तेथे घर बांधून द्या. शेंडी पोखर्डी ग्रामस्थांना वास योतो हा डेपो केडगांवला नेवू नव्या जागा शोधण्याचे काम प्रशासनाचे आहे. जसे वीज केंद्र उभारले तसे अद्यावत अमरधाम व उद्यान उभारण्यासाठी कॅश निधीची तरतुद करण्यांत यावी.

**मा.श्री.स्वप्नील शिंदे :-** मा.सदस्यांची भावना आहे आपण रुलिंग द्यावे.

**मा.महापौर सो :-** स्वेच्छा निधी / नगरसेवक निधी रोख स्वरुपाचा करण्यात यावा. सन २०१८-२०१९ चे सुधारित व सन २०१९ -२०२० चे मुळ अंदाजपत्रक मा.स्थायी समिती ठराव क्र. ६१ दिनांक ०७/०३/२०१९ अन्वये शिफारशीसह मंजुरी देण्यांत येत आहे. त्यामध्ये अंदाजपत्रकाच्या प्रस्तावात महासभेने केलेले बदल ------------

ऑफिस रिपोर्ट मंजूर खर्च मंजूर सभेचे इतिवृत्ताचे मंजूरीची वाट न पाहता कार्यवाही करण्यांत यावी.

---*---

## मा.महापौर साहेब यांचे मनोगत

## ।। नमस्कार ।।

अहमदनगर शहराचे ग्राम दैवत श्री. विशाल गणपती व महाराष्ट्राचे कुलस्वामिनी आई तुळजा भवानी, संत ज्ञानेश्वर महाराज , जगतगुरू संत तुकाराम महाराज व राष्ट्रसंत आनंदऋषीजी म.सा. महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज ,माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी, हिंदू हदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या आर्शिवादाने, तसेच महात्मा ज्योतिबा फुले, शाहु महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचाराने नागरिकांना चांगल्या नागरी सुविधा देण्यासाठी पंतप्रधान मा.ना.श्री.नरेंद्रजी मोदी साहेब, राज्याचे मुख्यमंत्री मा.ना.श्री.देवेंद्रजी फडणवीस साहेब, माजी केंद्रीय मंत्री मा.श्री.शरदचंद्रजी पवार साहेब, शिवसेना पक्ष प्रमुख मा.श्री.उध्दवजी ठाकरे साहेब, ग्राहक संरक्षण आणि अन्न पुरवठा मंत्री मा.ना.श्री.रावसाहेबजी दानवे साहेब, जलसंपदा मंत्री मा.ना.श्री.गिरिषजी महाजन साहेब, अहमदनगर जिल्हा पालकमंत्री मा.ना.श्री.रामजी शिंदे साहेब, गृहनिर्माण मंत्री मा.ना.श्री राधाकृष्ण विखे पा.साहेब, मा.खा.डॉ.श्री.सुजय विखे पा. साहेब, माजी खासदार मा.श्री.दिलीपजी गांधी साहेब, मा.आ.श्री.अरूणकाका जगताप साहेब, मा.आ.श्री.संग्रामभैय्या जगताप साहेब, शिवसेना उपनेते मा.श्री.अनिलभैय्या राठोड साहेब, सर्व मनपा पदाधिकारी , सर्व सहकारी नगरसेवक , नगरसेविका आपले मार्गदर्शन व सहकार्य तसेच अधिकारी व कर्मचारी वर्गाचे सर्वतोपरी सहकार्य मला कामकाज करतांना मिळत आहे, शहराचा विकासाचा अनुशेष मोठा असून तो भरून काढण्यासाठी मा.शासनाकडून महानगरपालिकेस रूपये १०० कोटी निधी प्राप्त झाला आहे. आणखी निधी मिळणार आहे. महानगरपालिकेच्या माध्यमातून नागरिकांच्या नागरी सुविधेसह शहराचा विकास कामांद्वारे चेहरा बदलण्याचा प्रयत्न करित आहे. मी अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षाचे अंदाज पत्रक घेउन आपणा समोर येत आहे.

या आर्थिक वर्षामध्ये नागरिकांना नागरी सुविधा देताना शहर व उपनगराच्या विकासाच्या दृष्टीने व आपणा सर्वांच्या सहकार्याने तसेच शहर सुधार समिती , सर्व सामाजिक संस्था, अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थी यांच्या सहकार्यान शहराचा विकास करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. मनपाचे उत्पन्नाचे स्त्रोत वाढविण्यासाठी , मनपाचा इतर खर्च कमी होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात येणार आहे.

- शहराच्या सौदर्यात भर पडण्याच्या दृष्टिने सीनानदी सुशोभिकरणाचे काम करण्याचा मानस असून पहिल्या टप्प्यात नालेगांव ते काटवन खंडोबा पुलापर्यत सीना नदी सुशोभिकरणासाठी डीपीआर तयार करण्याच्या सुचना देण्यात आलेल्या आहे.
- अहमदनगर नगर शहर व परिसरातील राष्ट्रसंत आनंदऋषीजी महाराज साहेब यांचे समाधीस्थळ, विशाल गणपती मंदिर, अवतार मेहरबाबा, केडगांव येथील रेणुका देवी, भिंगार येथील रोकडेश्वर मंदिर तसेच फ-याबाग , भिस्तबाग महाल , अहमद शहा बादशहा यांचे समाधीस्थळ परिसर बागरोजा, भुईकोट किल्ला अशा परिसरातील ऐतिहासिक व धार्मिक असलेल्या परिसराचा विकास होण्याकरिता पर्यटनाच्या माध्यमातून विकास योजना राबविल्याने या मधून विविध व्यवसायांना चालना मिळून रोजगार निर्मिती होण्यास मदत होणार आहे. याकरिता मा.शासनाकडून निधी उपलब्ध होण्यासाठी प्रयत्न करणार आहे.
- शहरातील नागरिकांना माफक दरामध्ये एमआरआय स्कॅन सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टिने जिल्हा नियोजन अंतर्गत निधीची मागणी करण्यात आली होती. त्यासाठी रक्कम रूपये ३ कोटी मंजूर झाले असून अत्याधुनिक एमआरआय स्कॅन मशिन मनपाच्या नविपेठ येथील दवाखान्यामध्ये बसविण्यात येणार असून त्याबाबतची निविदा प्रक्रिया सुरू आहे.
- कै.बा.देशपांडे दवाखान्याची इमारत अत्यंत जुनी असून या दवाखान्यामध्ये जिल्हयातून गरजू व गरिब रूग्ण येतात. रूग्णांना चांगल्या सुविधा देण्याच्या दृष्टिने जुन्या इमारती जवळ मनपाच्या माध्यमातून नविन इमारत बांधकाम करण्याचे दृष्टिने कार्यवाही करण्यात येणार आहे.

- चितळे रोड येथे सिव्हील हॉस्पीटलची जागा असून या ठिकाणी शॉपिंग कॉम्प्लेक्स व पार्किंगसाठी जागा मनपास मिळणेबाबतचा प्रस्ताव मा.शासनाकडे प्रलंबित असून सदरची जागा मनपास मिळणे कामी मा.शासनाकडे पाठपुरावा करून जागा ताब्यात घेण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल. त्यामाध्यमातून मनपास उत्पन्न सुरू होईल.
- चितळे रोड येथील नेहरू मार्केट इमारत व सावेडी शॉपिंग कॉम्प्लेक्स मनपाच्या माध्यमातून बांधण्याबाबतचा मानस असून सदरचे इमारतीचे बांधकाम झाल्यास शहरातील बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होण्यास मदत होवून मनपाचे उत्पन्नात देखील वाढ होईल.
- शहरामध्ये महिलांसाठी शौचालयाची व्यवस्था नाही त्यामुळे महिलांची गैरसोय होते. याकरिता गंजबाजार, गाडगीळ पटांगण, महालक्ष्मी उदयान, सावेडी जॉगिंग ट्रॅक येथे शौचालय बांधण्याच्या दृष्टिने कार्यवाही करणे बाबत संबंधीत विभागास आदेश देण्यात आलेले आहेत.
- शहरातील व एमआयडीसी येथील उदयोजक यांच्यामार्फत खाजगीकरणाच्या माध्यमातून चौक सुशोभिकरण करण्याच्या दृष्टिने काही उदयोजक व व्यवसाय संस्था यांचेशी चर्चा केलेली असून त्यांचेमार्फत शहरातील जास्तीत जास्त चौक सुशोभिकरण करणे बाबत कार्यवाही केली जाईल.
- प्रलंबित असलेला सावेडी उपनगरामधील नाटयगृह आधुनिक व अद्यावत पध्दतीचे नाटयगृह बांधणेचे काम सुरू आहे. नाटयगृहाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत.
- सावेडी परिसरासाठी स्मशानभूमी उभारणे ही गेल्या अनेक वर्षापासून नागरिकांची मागणी आहे. त्यादृष्टिने नगररचना विभागा कडून जागेबाबत कार्यवाही सुरू असून आरक्षीत जागेबाबत टीडीआर अथवा भूसंपादनाच्या माध्यमातील कार्यवाही प्रशासनाने लवकरात लवकर करावी. असे आदेश देण्यात आलेले आहे. जेणे करून सावेडी भागात स्मशानभूमी उभारता येईल.
- नागरीकांना पिण्याचे पाणी मुबलक व सुरळीत होण्यासाठी पाण्याचा उपसा वाढविण्यासाठी अमृत योजने अंतर्गत सुरू असलेल्या मुळा डॅम ते विळद येथील पिण्याच्या पाण्याचे पाईप लाईन टाकणेचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यात येईल यादृष्टिने प्रयत्न सुरू आहेत.
- शहरी भुयारी गटर योजनेचे काम सुरू असून लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत.
- शहरातील व राज्यातील कुस्तीपटूना प्रोत्साहन मिळण्याच्या दृष्टिने महापौर चषक स्पर्धे अंतर्गत महापौर केसरी कुस्ती स्पर्धा भरविण्याचा मानस आहे.
- भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्याच्या दृष्टिने प्रशासनास कार्यवाही करण्याच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच छत्रपती संभाजी महाराज यांचा पुर्णाकृती पुतळा उभारणेबाबत जागा निश्चिती करून लवकरच पुढील कार्यवाही करण्याच्या सुचना दिल्या आहेत. तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक उभारण्याच्या दृष्टिने देखील ठराव पारित झालेला असून त्याची ही कार्यवाही हाती घेण्याचा मानस आहे.
- नगर शहर स्वच्छ व सुंदर होण्यासाठी तसेच शहराचा स्वच्छ सर्व्हेक्षण यादीमध्ये १०० च्या आत नंबर येण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरू असून काही सामाजिक संस्था, स्वच्छता रक्षक ,स्वच्छता दूत व नागरिकांच्या सहकार्याने शहरामध्ये स्वच्छता अभियान राबवनू शहर स्वच्छ ठेवण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. याकरिता आवश्यक असणारे यंत्र सामग्री खरेदी बाबत कार्यवाही सुरू आहे.तसेच कचरा संकलन व वाहतुक बाबत देखील लवकरच कार्यवाही होण्याच्या दृष्टिने निविदा प्रक्रिया सुरू आहे. बुरूडगांव येथे १०० मेट्रीक टन क्षमतेचा खतनिर्मिती प्रकल्प उभारणेकरिता निविदा मागविण्यात आलेल्या आहेत.

- शहरातील कच-याच्या विल्हेवाटीचा मोठा प्रश्न असून कचरा प्रश्ना बाबत वेळोवेळी आंदोलन देखील झाले आहे यासाठी प्रत्येक झोन मध्ये विकेंद्रीत कंम्पोस्ट प्लॅंट उभारल्यास कच-याची विल्हेवाट लावणे सोयीचे होईल कच-याची समस्या सुटण्यास मदत होवून मनपाच्या खर्चात देखील बचत होईल. या दृष्टिने प्रयत्न करण्यात येणार आहे.
- पिंपळगांव माळवी येथे सौर उर्जा प्रकल्प राबविणे बाबत प्रशासनाकडून कार्यवाही सुरू असून त्यास गती देवून लवकरच प्रकल्पाचे काम सुरू करणेबाबत प्रयत्न करण्यात येईल त्यामुळे मनपाच्या खर्चात बचत होईल.
- मनपाचे आर्थिक उत्पन्नाचे स्त्रोत मोठया स्वरूपात वाढविणे आवश्यक आहे या दृष्टिने मनपाच्या पिंपळगांव माळवी येथील जागेत पुणे ,मुंबई च्या धर्तीवर नविन प्रकल्प आणणे बाबत प्रयत्न सुरू असून प्रकल्पाच्या माध्यमातून मनपास कायम स्वरूपी उत्पन्न सुरू व्हावे या दृष्टिने कार्यवाही करणार आहे.
- शहरातील मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त योग्य पध्दतीने होण्यासाठी जिल्हा नियोजन अंतर्गत निधीची मागणी करण्यात आली होती यासाठी रक्कम रूपये १५ लाख मंजूर झाले असून मनपाच्या पिंपळगांव माळवी येथे डॉग होस्टेलची उभारणी करण्यात येणार आहे त्याबाबतची प्रक्रिया सुरू आहे. लवकरच कामास सुरूवात होवून मोकाट कुत्र्याचा प्रश्न मार्गी लागण्यास मदत होईल.
- महानगरपालिकेच्या बागा आकर्षक करण्यासाठी तसेच नागरिकांना फिरण्यासाठी व लहान मुलांना खेळण्यासाठी, प्रसन्न वातावरण असणे तसेच शहर सौदर्यामध्ये भर पडण्याच्या दृष्टिने खाजगी करणातून सार्वजनिक बागांचा विकास करण्याचा मानस आहे. तसेच अमृत योजने अंतर्गत शहर व उपनगरामध्ये उदयान विकसीत करण्याचे काम सुरू करण्यात आले आहे.
- मा.शासनाच्या नगरोत्थान योजना (जिल्हास्तर), दलित वस्ती सुधार योजना, रस्ता अनुदान, मुलभूत सोयी सुविधा विकास योजना ,नागरी दलितेतर विकास निधी, अल्प संख्यांक बहुल क्षेत्र विकास योजना तसेच नाविन्य पूर्ण प्रस्तावातून जिल्हा नियोजन समिती कडून मान्यता दिल्यानुसार करावयाची कामे अशा विविध मा.शासनाच्या अर्थ सहाय्य असलेल्या योजना निविदा तसेच इतर कार्यालयीन सोपस्कार कालबध्द मुदतीमध्ये पूर्ण करून विकास कामांना गती देण्यात येईल.
- शहरातील बेघर व फुटपाथवर राहणा-या नागरिकांसाठी रात्रनिवारा इमारत बांधण्यात आली असून बेघर व फुटपाथवर राहणा-या नागरिकांसाठी निवा-याची सोय होणार आहे.
- मा.शासनाने सर्वानसाठी घरे च्या धोरणानुसार अहमदनगर महानगरपालिकेमार्फत प्रधान मंत्री आवास योजने अंतर्गत केडगांव येथे ६१२ घरे व काटवन खंडोबा येथे १९२ घरांचा प्रस्ताव मंजूर असून घरे बांधण्याबाबतचा प्रस्ताव निविदा स्तरावर आहे. तसेच काटवन खंडोबा जवळ आगरकर मळा ५५० सदनिका बांधण्याचा प्रस्ताव मा.शासनाकडे सादर करण्यात येत आहे. संजय नगर येथे २९८ सदनिका या योजने अंतर्गत मंजूर झाले असून पहिल्या इमारतीचे बांधकाम सुरू झाले आहे.
- मनपाच्या ज्या कर्मचा-यांकडे स्वत:चे सदनिका नाही अशा वर्ग ३ व ४ श्रेणीतील कर्मचा-यासाठी सदनिका बांधणेचा मानस आहे. याकरिता जागा उपलब्धतेसाठी नगर रचना विभागास सुचना देण्यात आलेल्या आहेत.
- अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजना फेज-२ योजनेचे काम अनेक वर्षा पासून सुरू असून या विभागाची बैठक घेवून योजनेच्या कामास गती देण्यात आली असून ज्या भागात काम पूर्ण झाले असेल अशा भागातील पाणी पुरवठा वितरणाबाबत कार्यवाही करण्याच्या सुचना देण्यात आलेल्या असून अशा भागात नागरिकांना पाणी वितरणाचे काम करण्याबाबत लवकरच कार्यवाही करण्यात येईल.
- मा.शासनाकडून मुलभूत सोयी सुविधा योजने अंतर्गत सुमारे १० कोटी रूपयाचा निधी मनपास प्राप्त झाला आहे. त्यामधून विकास कामांच्या माध्यमातून शहराच्या वैभवात भर पडणार आहे.

- मनपाच्या उदयानाजवळ असलेल्या जागेत गाळे बांधून त्याद्वारे मनपाचे उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न करणार आहे.
- शहराच्या विकासासाठी राज्यसभा खासदार तसेच विधान परिषद आमदार यांचा निधी मिळविण्यासाठी प्रयत्न करणार असून त्याद्वारे देखील शहरातील कामे करण्याचा प्रयत्न करणार आहे.

सन २०१९-२०२० चे अंदाजपत्रक प्रशासनाने तयार करून मा.महासभेपुढे सादर केले आहे. महानगरपालिका उत्पन्नाचे स्त्रोत तसेच नागरिकांच्या नागरी सुविधेसाठी आवश्यक असणारा निधी याचा विचार करता मा.शासनाकडे मोठया स्वरूपात निधीची मागणी करण्यात आलेली असून मा.शासनाकडून निश्चितपणे निधी उपलब्ध होणार आहे. त्यामधून शहराचा विकास निश्चित होईल . यामाध्यमातून शहरातील नागरिकांना मुलभूत सुविधा मिळण्यास मदत होणार आहे.

या सर्वाचा विचार करून या शहराचे नागरिक निश्चितपणे मनपास सहकार्य करतील अशी अपेक्षा आहे. तसेच आपल्या सर्वांचे मार्गदर्शन व सहकार्य याची अपेक्षा करित असून ते आपणा सर्वांनकडून निश्चित मिळेल या अपेक्षेसह उपस्थित पदाधिकारी, नगरसेवक, नगरसेविका, अधिकारी व पत्रकार बंधू व इलेक्ट्रॉनिक मिडीया यांचे प्रतिनिधी यांनी माझे मनोगत शांतपणे ऐकून घेतले याबद्दल आभार.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !

सही/-
बाबासाहेब वाकळे
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**ठराव :-**

सन २०१८-२०१९ चे जमा व खर्च बाजूमध्ये सुधारीत व सन २०१९-२०२० चे अंदाजपत्रकाबाबत मा.स्थायी समितीने केलेल्या सुचना, दुरूस्त्या व फेरफार व शिफारशीसह तसेच मा.महासभेमध्ये मा.सदस्यांनी केलेल्या सुचना व दिलेले पत्र तसेच दुरूस्त्या फेरफार यासह अंदाजपत्रकास ही सभा मान्यता देत आहे. तसेच मा.महासभेमध्ये प्रामुख्याने झालेल्या चर्चेनुसार पुढील प्रमाणे मुद्यांबाबत कार्यवाही करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

* सभागृहात झालेल्या चर्चे नुसार छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा नविन प्रशासकीय इमारत येथील प्रांगणात उभारणेस ही सभा मान्यता देत आहे. याकरिता समिती गठीत करण्यात येत असून यांच्या माध्यमातून प्रशासनाने लवकरात लवकर पुतळा बसविणे बाबतची कार्यवाही करावी.

* नगरसेवक मा.श्री.कुमार वाकळे यांनी सभागृहात केलेल्या चर्चे नुसार नगर पुणे महामार्गावर एस.टी.स्टॅण्ड चौकात रोड लगत असलेल्या पशु वैद्यकिय दवाखाना जिल्हा परिषद आवार (नगर भूमापन क्रमांक १९५ प्लॉट नं. १९५ क्षेत्र ७३५७ चौ.मी. ) या जागे पैकी दक्षिणेकडील १० गुंठे जागा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा उभारणे कामी अहमदनगर महानगरपालिकेस जागा मिळणे कामी प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी.

* पुतळा बसविणे या लेखाशिर्षात रक्कम रूपये ५० लाख तरतूद करण्यात यावी.

* अहमदनगर मनपा हद्दीमध्ये नविन बांधकाम झालेले आहेत. सदर बांधकामाचे मनपा कर्मचा-यां मार्फत मोजमापे घेवून त्यांना आकारणी करण्याबाबत कार्यवाही करावी. याकामास प्राधान्य देण्यात यावे. यामधून कर्मचारी कामात हलगजीर्पणा करत असतील तर त्यांच्यावर निलंबनासारखी कार्यवाही करण्यात यावी.

*	नगरसेवक मा.श्री. रविंद्र बारस्कर यांनी दिलेल्या पत्रानुसार १) सावेडी नाका ते रेणाविकर शाळेपर्यत रस्ता २) भिडे हॉस्पीटल ते नवनाथ सायकल सेंटर ते पाटील चौक पयर्त रस्ता ३) रेणाविकर कॉलनी येथील ओपन स्पेसला वॉल कंम्पाउंड करणे , खेळणी बसविणे, जॉगिंग ट्रॅक ,विद्युत व्यवस्था करणे सदरील कामे मॉडेल रस्ता या लेखाशिर्षा अंतर्गत प्रस्तावित करण्यात यावा.

*	उपमहापौर मा.सौ.मालनताई ढोणे यांनी दिलेल्या पत्रानुसार मनपाच्या अधिकारी व कर्मचारी करिता दिवाळी सणाकरिता सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षात सानुग्रह अनुदान या लेखाशिर्षात रक्कम रूपये ९५ लाखाची तरतूद करण्यात यावी.

*	नगरसेविका मा.सौ.दिपालीताई बारस्कर यांनी मांडलेल्या सुचनेनुसार कसबे वस्ती येथे पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन टाकणे आवश्यक असल्याने या बाबत संबंधीत विभागाने पाहणी करून सदर ठिकाणी पिण्याच्या पाण्याची लाईन टाकणे बाबत कार्यवाही करावी.

*	मनपा हद्दीतील वृक्षांची संख्या कळण्यासाठी वृक्ष गणना करणे या लेखाशिर्षात रक्कम रूपये ५ लाखाची तरतूद करण्यात यावी. सदरचे कामास प्राधान्य देण्यात यावे.

*	अहमदनगर महानगरपालिकेच्या कै.बा.देशपांडे दवाखान्याची इमारत जुनी झाली असून सदर ठिकाणी मोकळया जागेत नविन इमारत बांधून रूग्णांना चांगली सेवा देण्याच्या दृष्टिने निधीची मागणीचा प्रस्ताव मा.शासनाकडे पाठविण्याबाबत कार्यवाही करावी.

*	मनपा कर्मचा-यांच्या वैद्यकिय प्रतिपूर्तीचे देयके देण्यासाठी वैद्यकिय प्रतिपुर्ती या लेखाशिर्षात रक्कम रूपये २५ लाख वाढ करण्यात यावी.

*	सावेडी गांवठाण चा सिटी सर्व्हे करणे बाबत संबंधीत विभागाने आवश्यक ती कार्यवाही करून लवकरात लवकर सिटी सर्व्हेचे काम करण्यात यावे.

*	नगरसेविका मा.सौ.सोनालीताई चितळे यांनी दिलेल्या पत्रानुसार महिला जलतरण तलाव बांधणेसाठी मोठया स्वरूपात निधीची आवश्यकता असल्याने सविस्तर प्रस्ताव तयार करून मा.शासनाकडे निधीची मागणी करण्यात यावी.

*	सावेडी भागात बांधकाम परवानगी अंतर्गत विकास कामे करण्यासाठी बांधकाम परवानगी अंतर्गत सुधारणा या लेखाशिर्षात जमा व खर्च बाजू ३६.०० लाख रुपयांनी वाढ करण्यात यावी.

*	शहर व उपनगरातील स्ट्रीट लाईट देखभाल दुरूस्तीसाठी विद्युत साहित्य खरेदी करणे या लेखाशिर्षात रक्कम रूपये दीड कोटीची तरतूद करण्यात यावी.

*	विविध कंपन्याकडून मनपा हद्दीत केबल टाकण्यासाठी रस्ते खोदाई केली जाते. रस्ता खोदाई करणेसाठीचा दर त्यांना आकारला जातो. त्या दरात प्रति चौरस मीटर रक्कम रूपये २०००/- करण्यात यावा.

*	रस्ता खोदाई या लेखाशिर्षात रक्कम रूपये ५० लाखने वाढ करण्यात यावी.

*	नगरसेवक मा.श्री.गणेश भोसले यांनी सुचित केल्यानुसार शाहू व्यायाम शाळा पाडून त्या ठिकाणी महिला जिम किंवा उदयान करणेकामीचा प्रस्ताव तयार करून यासाठी येणारा खर्च नविन इमारत या लेखाशिर्षामधून करण्यात यावा.

*	विकासभार या लेखाशिर्षात जमा बाजुस रक्कम रूपये १ कोटी २८ लाख वाढ करण्यांत यावी. विकासभार खर्च बाजुस ३२.०० लाख व विकास भार भूसंपादन खर्च बाजुस ९६.०० लाख तरतुद करण्यांत यावी.

*	अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक पोटी प्रिमीयम रकमेतून कामे करणे या लेखाशिर्षात ५० लाख वाढ करण्यात यावी.

*	शहरातील  स्ट्रीट लाईट देखभाल दुरूस्तीसाठी वायरमनची संख्या कमी असल्याने शहरातील व उपनगरातील दुरूस्तीची कामे होत नाही याकरिता  १० वायरमन मानधनावर घेण्यात आलेले आहेत. आणखी ५ वायरमन मानधनावर घेणे बाबत कार्यवाही करावी. वायरमन मानधन या लेखाशिर्षात रक्कम रूपये ५ लाख वाढविण्यात यावे

*	महालक्ष्मी उदयान, सिध्दीबाग खाजगी करणाच्या माध्यमातून विकसीत करणे कामी निविदा मागविणे बाबत कार्यवाही करावी. शहरातील प्रमुख चौक सुशोभिकरण करण्याच्या दृष्टिने खाजगी संस्था, कंपनी, सामाजिक संस्था, यांचे मार्फत कार्यवाही करण्यात यावी. तसेच शहरातील प्रमुख रस्त्यावरील डिव्हायडर सुशोभिकरण करणे देखील आवश्यक असून त्यामुळे परिसर देखील सुशोभित होईल याकरिता डिव्हायडर सुशोभिकरण  खाजगी संस्था, कपंनी, सामाजिक संस्था यांचे मार्फत करण्याबाबत परवानगी देण्यात यावी. याकामासाठी त्यांना कमीत कमी पाच वर्षापर्यतचा कालावधी  देण्याबाबत कार्यवाही करावी. यास ही सभा मान्यता देत आहे.

*	सावेडी परिसरासाठी स्मशानभूमी उभारणे  ही गेल्या अनेक वर्षापासून नागरिकांची मागणी आहे या दृष्टिने नगररचनाकार व मा.आयुक्त यांनी याबाबत लक्ष घालून याबाबत योग्य ती कार्यवाही करणेसाठी टीडीआर अथवा भूसंपादनाच्या माध्यमातील कार्यवाही प्रशासनाने लवकरात लवकर करून व जागा ताब्यात घेवून स्मशानभूमी उभारण्याच्या दृष्टिने  कार्यवाही करावी. सदर कामास प्राधान्य देण्यात यावे.

*	महापौर केसरी कुस्ती स्पर्धा, क्रिकेट स्पर्धा व इतरही स्पर्धा आयोजित करावयाची असल्याने महापौर चषक स्पर्धा या लेखाशिर्षात रक्कम रूपये  ३० लाख  करण्यात यावी.

*	रसिक ग्रुप अहमदनगर व नगर जल्लोष ट्रस्ट, अहमदनगर यांना सांस्कृतिक कार्यक्रमासाठी मागणी केल्यानुसार प्रत्येकी रक्कम रू. दीड  लाख अर्थ सहाय्य देण्यास ही सभा मान्यता देत आहे. तसेच मागणी केलेल्या संस्थाचे धर्मदाय आयुक्त यांचेकडील नोंदणीकृत असलेबाबत कागदपत्र, ताळेबंद व चार्टड अकौंट यांचेकडील हिशोब तपासणी आदी आवश्यक कागदपत्रांची खातरजमा करूनच संस्थाना अर्थ सहाय्य देणे बाबत कार्यवाही करणेत यावी. सदरचा खर्च सामाजिक संस्थांना देणगी या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात यावी.

*	रसिक ग्रुप अहमदनगर यांनी सांस्कृतिक कार्यक्रमासाठी सन २०१४-२०१५ साठी अर्ज दाखल केला होता परंतु निधी अभावी त्यांना सदरचे अर्थ सहाय्य त्यांना देण्यात आलेले नाही. सदर संस्थेस सन २०१४-२०१५ साठीचा रक्कम रूपये २ लाख अर्थ सहाय्य देण्यास ही सभा मान्यता देत आहे. सदरचा खर्च सामाजिक संस्थाना देणगी या लेखाशिर्षा मधून करण्यात यावा.

*	सभागृह नेता मा.श्री.स्वप्निल शिंदे यांनी मा.महासभेमध्ये मांडलेल्या सुचनानुसार मा.शासनाकडून विविध विकास कामांसाठी विविध योजने अंतर्गत मनपास निधी मंजूर करण्यात येतो. सन २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० साठी प्राप्त होणा-या मुलभूत / प्राथमिक सोयी सुविधा विकास निधी , रस्ता अनुदान, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर), नागरी दलित वस्ती सुधार योजना, अल्पसंख्याक बहुलक्षेत्र विकास निधी, नागरी दलितेतर विकास निधी , नाविन्यपूर्ण योजने अंतर्गत निधी तसेच इतर कोणताही निधी  आदी  मा.शासनाच्या निधीतील कामे सुचीत करण्याचा अधिकार मा.महापौर साहेब यांना देण्यात येत आहे यास ही सभा मान्यता देत आहे.

*	शहर व उपनगरात महिलांसाठी शौचालयाची व्यवस्था नाही त्यामुळे महिलांची गैरसोय होते. याकरिता बाजार पेठ, मुख्य रस्ते अशा ठिकणी जागा उपलब्ध करून  शौचालय बांधण्यासाठी संबंधीत विभागाने कार्यवाही करावी. सदरच्या कामास प्राधान्य देवून लवकरात लवकर कार्यवाही करावी.

* स्वर्गीय प्रमोदजी महाजन स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र इमारतीचे काम पूर्ण झाले असून अंतर्गत बैठक व्यवस्था व इतर किरकोळ कामे बाकी असून सदरची कामे करण्यासाठी विकास भार निधीतून ५ लाखाचा खर्च करण्यात यावा.

* मा.सौ.अश्विनी जाधव नगरसेविका यांनी दिलेल्या पत्रानुसार मंगलगेट मटन मार्केट दुरूस्ती करणे असे लेखाशिर्ष करण्यात आले असून सदर दुरूस्ती केलेली कामांची देयके मार्केट विभाग वसुल करित असलेल्या गाळेभाडे पोटी येणा-या उत्पन्नातून अदा करण्यात यावी.

* मा.सौ.अश्विनी जाधव नगरसेविका यांनी दिलेल्या पत्रानुसार प्रभाग क्र. १० मधील मंगलगेट हवेली येथील समाज मंदिराचे दुरूस्तीचे कामासाठी रक्कम रूपये १५ लाखाची तरतूद इमारत दुरुस्ती या लेखाशिर्षातुन करण्यात यावी. इमारत दुरुस्ती या लेखाशिर्षात रक्कम रु.१५.०० लक्ष ने वाढ करण्यांत यावी. सदर दुरूस्तीच्या कामाचे देयके अनाधिकृत बांधकाम नियमाकुल करणे या लेखाशिर्षातून भागविण्यात यावा.

* सभागृह नेत मा.श्री.स्वप्निल शिंदे यांनी दिलेल्या पत्रानुसार सभागृह नेता शहर विकास निधी या लेखाशिर्षात रक्कम रूपये २५ लाखाची वाढ करण्यात यावी.

* श्री.शेख मुदस्सर जहॉगीर ,सभापती स्थायी समिती यांनी दिलेल्या पत्रानुसार प्रभाग क्र.१० साठी त्यांनी स्थायी समितीमध्ये सुचविलेल्या ठरावातील डांबरीकरणाच्या कामाऐवजी प्रभाग क्रमांक १० मधील खानका शरीफ मध्ये नसिम घर ते सय्यद बेकरी ते डॉ.जाकिर ते हाजी शेरअली घरापर्यचा रस्ता कॉक्रीटीकरण व बंद पाईप गटर (३०० एमएम ) करणे.

* मा.सदस्य यांच्या प्रभागात विकास कामांसाठी निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टिने त्यांच्या मागणी नुसार सदस्य स्वेच्छा निधी व वॉर्ड विकास निधी दोन्ही मिळून प्रत्येकी सदस्यास रक्कम रूपये १४ लाख तरतूद करण्यात यावी . सदर निधीतील विकास कामांची देयके तातडीने देण्याच्या दृष्टिने तरतूद स्वतंत्र ठेवून देयके तातडीने देणे बाबत अर्थ विभागाने कार्यवाही करावी. वॉर्ड विकास निधी या लेखाशिर्षात रक्कम रूपये ७३ लाखानी वाढ करण्यात यावी.

* अपंग पुर्नवसन योजने अंतर्गत अपंगाना मानधन देण्यात येते अपंगाची मानधनाबाबत मनपास अर्ज प्राप्त होत आहेत त्या दृष्टिने अपंग पुर्नवसन योजना या लेखाशिर्षात १ कोटी ५३ लाख तरतुद करण्यात यावी.

* शहर व उपनगरामध्ये स्वच्छता अभियान सक्षमपणे राबविण्यासाठी यासाठी स्वतंत्र तरतूद करणे आवश्यक आहे. यासाठी स्वच्छता अभियान राबविणे खर्च असे लेखाशिर्ष करून त्यामध्ये रक्कम रूपये ५० लाखाची तरतूद करण्यात यावी.

* इंदिरा नगर व शास्त्री नगर परिसरामध्ये नागरिकांना आरोग्य सेवा उपलब्ध होण्याच्या दृष्टिने आरोग्य केंद्र उभारणेसाठी मा.शासनाकडे निधी मागणी बाबतचा प्रस्ताव पाठविणे बाबत कार्यवाही करावी.

* अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीच्या सभागृहाचे नुतनीकरणाचे उर्वरित काम प्राधान्याने संबंधितांकडून तातडीने पूर्ण करुन घेण्यात यावे. त्या नंतरच मे.सहकार एजन्सी यांची डिपॉझिट पोटी राहिलेली फॉरपिट झालेली रक्कम रूपये ३६,४४,३८४/-अदा करण्यासाठी ही सभा मान्यता देत आहे. याबाबत प्रशासनाने आवश्यक ती पुर्तता करणे बाबत कार्यवाही करावी.

* मा.श्री.रविंद्र बारस्कर नगरसेवक यांनी दिलेल्या पत्रानुसार सावेडी हद्दीतील सर्व्हे नंबर २१३/२, २०६/१ब/१अ+२०६/१ब२/१ ही जागा आयुर्वेद व्यासपीठ संस्थेस ३१ वर्षासाठी देण्यांत आलेली आहे. पुर्वीच्या अटी व शर्तीनुसार त्याच मुदतीपर्यंत सदर जागेत बांधण्यात आलेल्या आयुर्वेद परिचय केंद्र ही इमारत आयुर्वेद व्यासपीठ शाखा, नगर यांना वापर व देखभालीसाठी हस्तांतरीत करण्यांत यावी. यास ही सभा मान्यता देत आहे.

*        महानगरपालिका हद्दीतील स्ट्रीट लाईट, देखभाल दुरुस्ती खाजगी करणाच्या माध्यमातुन करण्याच्या दृष्टीने ई निविदा प्रक्रीया करुन प्रशासनाने याबाबत योग्य ती कार्यवाही करावी. निविदाकार यांना देखभाल दुरुस्ती साठीचा खर्च विद्युत साहित्य खरेदी या लेखाशिर्षातुन भागविण्यांत यावा.

*        मा.उपमहापौर सौ.मालनताई ढोणे यांनी दिलेल्या पत्रानुसार सिध्देश्वर भागवत प्रिंटर्स यांचे सन २००३-२००४ या आर्थिक वर्षातील फॉरफीट झालेले छपाई टेंडर डिपॉझिट FDR रक्कम रु.१०,०००/- ची अदा करण्यांस ही सभा मान्यता देत आहे. याबाबत संबंधित विभागाने योग्य ती कार्यवाही करावी.

*        अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील रस्ते पॅचिंग करणे सन २०१७-२०१८ अंतर्गत ई-निविदा क्रमांक १९०२ या निविदेच्या मंजूरीबाबतचा प्रस्तावाचे मा.महासभेमध्ये अवलोकन करण्यांत आले. सदरच्या अवलोकनानुसार मंजूरी देण्यांत येत आहे.

*        जलशक्ती अभियान राबविणे याकरीता नविन लेखाशिर्ष तयार करुन सदर लेखाशिर्षात रक्कम रु. ५.०० लाखांची तरतुद करण्यांत यावी.

*        सर्वसाधारण कर या लेखाशिर्षा अंतर्गत ६ कोटी ०७ लाख रुपयांची वाढ करण्यांत यावी.

*        मार्केट सेवा कर या लेखाशिर्षात जमा व खर्च बाजुस रक्कम रुपये २० लाखाने तरतुद वाढ करण्यांत यावी.

सन २०१८-२०१९ चे सुधारित व सन २०१९-२०२० सालचे मुळ अंदाजपत्रक मा.स्थायी समितीने केलेल्या शिफारशी त्याबाबत मा.महासभेत झालेली चर्चा त्यामध्ये अंदाजपत्रकाच्या प्रस्तावात मा.महासभेने सुचित केलेले बदल, दुरूस्त्या व फेरफार यासह व सोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर. खर्च मंजूर. नियमाप्रमाणे पुढील योग्य ती कार्यवाही करावी. या सभेचे इतिवृत्त कायम होण्याची प्रतिक्षा न करता कार्यवाही करावी यास ही सभा मान्यता देत आहे.

तसेच सदर अंदाजपत्रकाच्या २०० प्रती छापून घेण्यास व त्याकामी येणा-या खर्चास ही सभा मान्यता देण्यात येत आहे. खर्च मंजूर.

नियमानुसार कार्यवाही करावी.

सुचक :- मा.सौ.मालन सुरेश ढोणे

अनुमोदक :- मा.सौ.आशा शिवाजी कराळे

ठराव सर्वानुमताने मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका